मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

बुधवार दि. ३० डिसेंबर १९९७ रोजी झालेल्या ५० व्या बैठकीचा

कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ५० वी बैठक मंगळवार दि. ३० डिसें. १९९७ रोजी दुपारी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन, सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] | ॲडव्होकेट श्री मधु चव्हाण, | सभापती. |
| २] | श्री एम. बी. अप्पलवार, | मुख्य अधिकारी. |
| ३] | ,, वि. म. कोकणे, | उपसचिव, महाराष्ट शासन. |
| ४] | ,, चंद्रकांत विश्वासराव, | सदस्य, |
| ५] | ,, अमोद उसपकर, | ,, |
| ६] | ,, भालचंद्र ठाकूर, | ,, |
| ७] | ,, दगडू सकपाळ, | ,, |
| ८] | ॲडव्होकेट प्रकाश भूवड, | ,, |
| ९] | श्री गणेश तिकोने, | ,, |
| १०] | डॉ. विनोद मेहता, | ,, |
| ११] | श्री अभय सावरकर, | ,, |
| १२] | ,, अनंत पालकर, | ,, |
| १३] | ,, दाजी [गोपाळ] मोडक, | ,, |
| १४] | प्रमुख अभियंता, म. न. पा. यांचे प्रतिनिधी. | निमंत्रक. |
| १५] | उपकर निर्धारक व संकलक [शहरे], म. न. पा. | निमंत्रक. |

बैठकीच्या सुरवातीस मा. सभापती यांनी आज दि. ३०. १२. ९७ रोजी होणाऱ्या सुवर्ण महोत्सवी बैठकीत उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिकाऱ्यांचे स्वागत केले. तदनंतर त्यांनी मुख्य अधिकारी/दु. व. पु. यांना विनंती केली की, त्यांनी त्यांच्यावतीने व शासनाच्यावतीने सर्व सन्मा. सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करावे.

मा. सभापतींच्या विनंतीस मान देऊन मुख्य अधिकारी/दु. व. पु. यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

......२

व मा. सभापती यांनी सर्व सन्मा. सदस्यांच्यावतीने मुख्य अधिकारी यांचे पुष्पगुच्छ देऊन मन:पूर्वक स्वागत केले.

त्यानंतर मा. सभापती यांनी सचिव यांना निमंत्रक मनपाचे अधिकारी व मंडळाच्या सर्व उपस्थित अधिकाऱ्यांस पुष्पगुच्छ प्रदान करण्यास सांगितले. त्यानुसार सचिव श्री सावंत यांनी सर्व उपस्थितांना पुष्पगुच्छ दिले.

उपमुख्य अभियंता श्री वणीकर यांनी मा. सभापती व सर्व सन्मा. सदस्यांना मंडळाच्या अधिकारीवर्गाच्यावतीने नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या व या सुवर्णमहोत्सवी बैठकीनिमित्त मा. सभापती, मा. उपसभापती, व सर्व सन्मा. सदस्यांचे अभिनंदन केले.

मा. सभापती यांनी उपस्थित सर्व अधिकारीवर्गाचे पुन्हा मन:पूर्वक अभिनंदन करुन असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या अधिकाऱ्यांनी व अभियंत्यांनी मुं. इ. दु. व. पु. मंडळाची स्थापना झाल्यानंतर मुंबईकरांची अतिशय चांगली सेवा केलेली आहे. अनेक तक्रारी असतात, अडचणी असतात, परंतु मुंबई शहरात येणारे जगातले लोक आश्चर्यचकित होतात की, अशा या शहराच्या घरांच्या दुरुस्तीचा व पुनर्रचनेचा प्रश्न हे मंडळ सोडवत आहे. मंडळाचे - मा. सदस्यही बैठकीतील चर्चेत अतिशय चांगला भाग घेतात असे गेल्या दोन वर्षापासून दिसून येत आहे. ते आपल्या भागातील जनतेचे प्रतिनिधीत्व करतात. मंडळाचे अभियंतेही चांगले काम करीत असल्याचा अनुभव आला आहे. युती शासनाच्यावतीने मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली जनतेला जी अनेक आश्वासने दिली होती त्यापैकी एक आश्वासन मुं. इ. दु. व. पु. मंडळाच्या पुनर्रचित इमारतीत रहाणाऱ्या भाडेकरुंबाबत सुकथनकर समितीचा अहवाल स्विकारण्यात आलेला आहे. सुकथनकर समितीच्या अहवालाची केवळ स्विकृती केली नाही तर सुकथनकर समितीचा मुं. इ. दु. व. पु. मंडळासंबंधी हा एकमेव अहवाल केवळ स्विकारला नाही तर मंत्री मंडळाने त्याला पूर्णत: मान्यता दिली आहे. उदा. गाळ्याचे किमान क्षेत्रफळ २२५ चौ. फू. करण्यात आले आहे. रु. १०००/- प्रति चौ. मी. या दराने दुरुस्ती खर्चास मान्यता देण्यात आली आहे. यापूर्वी "अ" वर्गातील इमारतींनाच नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येत होते त्यामुळे एखाद्या मालमत्तेवर "ब" व "क" वर्गातील इमारतींनासुध्दा आता नाहरकत प्रमाणपत्र देण्याचे मान्य झाले आहे. लगतच्या भूखंडाचे जर पाचपर्यंत मालमत्ताधारक एकत्र येऊन संयुक्त योजना राबवित असतील तर ६० टक्के चटईक्षेत्र निर्देशांक जास्त देण्याचे ठरले आहे. जर पाच आणि वरील मालमत्ताधारक एकत्र आले तर त्यांना ७० टक्के च. क्षे. नि.

देण्यात येईल. तसेच आतापर्यंत आपल्या मंडळास मिळणा-या ३.१९२ च.क्षे. नि. मध्ये आता वाढ करून तो मंडळास ४.०० किंवा मुळ भाडेकरूंच्या पुनर्वसनासाठी जो च.क्षे. नि. लागेल तेवढा च.क्षे. नि. त्यांना पुनर्बांधणीच्या वेळी देण्यात येईल. त्यामुळे यापुढे बृहत्सूची रहाणार नाही. त्याचबरोबर महानगरपालिका मंडळास ३ कोटी ६० देत होती. यापुढे म.न.पा. मंडळास १० कोटी अंशदान देईल व तशी तरतुद कायद्यात करण्यात आलेली आहे. सदर सवलतींची अंमलबजावणी सध्या करता येणार नाही कारण केंद्रीय निवडणुक आयोगाने याबाबत आचारसंहिता लागू केलेली आहे. प्राधिकरण मंडळास वेळोवेळी करोडो रुपये कर्जाऊ देत होते. त्यासाठी मंडळ प्राधिकरणास ४ टक्के ते १२ टक्के व्याज देत असे. यापुढे प्राधिकरण मंडळास १० कोटी रुपये अधिकृतपणे देणार आहे. तसेच दुरूस्ती मंडळास यापूर्वी कायद्याप्रमाणे ३ कोटी ६० लाख रुपये देणे शासनावर बंधनकारक होते. परंतु वेळोवेळी शासन कधी १२ कोटी, कधी ८ कोटी देत असे. परंतु आता कायद्यात अशी तरतुद करण्यात आली आहे की, जेवढा उपकर गोळा होईल तेवढेच अनुदान शासनाने दिले पाहीजे. म्हणजे सुमारे ४५ कोटी रुपये यावर्षीच्या अंदाजपत्रकात मिळतील. शासनाच्या मोफत घर योजनेबाबत तक्रारी आल्या तरीही असे दिसून येईल की, आज मंडळाने एखादी इमारत बांधली तर भाडेकरूंना ती मोफतच दिल्यासारखी असते कारण भाडेकरूंना गाळ्यांचे वाटप केले जाते व फक्त त्यांच्याकडून देखभाल खर्च घेतला जातो. जसे संडास, बाथरूम घरात असलेल्या गाळेधारकांना ५० पैसे प्रति चौ. फू, सामाईक संडास असणा-या भाडेकरूंकडून ४० पैसे प्रति चौ. फू. घेण्यात येतात म्हणजेच गाळ्यामागे रु. १००/- ते रु. १२५/- भाडे घेतले जाते. त्यांच्याकडून पुनर्रचनेच्या बांधकामाचा खर्च घेतला जात नाही. यापुढे त्यांना मंडळ इमारत मालकी तत्वावर बांधून देईल व त्यांची देखभाल भाडेकरूंच्या संस्थेवरच सोपविण्यात येणार आहे.

मा. सभापती यांनी मंडळाच्या आजच्या बैठकीत युती शासनाचे मा. मुख्य मंत्री, व मा. उपमुख्य मंत्री यांचा गौरवपूर्वक उल्लेख करून त्यांचे सर्वांच्यावतीने व मुंबईतील जनतेच्यावतीने आभार मानले. मा. सभापती यांनी नंतर अधिकारीवर्गाला मार्गदर्शन करताना सांगितले की, मंडळास आवश्यक तेवढे पैसे व मिळणा-या वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकाचा फायदा घेऊन मंडळाच्या आजच्या सुवर्णमहोत्सवी बैठकीमध्ये मुंबईच्या जनतेची अधिक चांगल्याप्रकारे सेवा करण्याचा संकल्प करूया.

वरील भाषणानंतर मा. सभापती यांनी सचिव श्री सावंत यांना आजच्या बैठकीचे कामकाज सुरू करण्याच्या सूचना दिल्या.

बाब क्रमांक : ५०/२. [पुनर्बांधणी विभाग]

विषय- तेजुकाया मॅन्शन-२, डॉ. आंबेडकर रोड, लालबाग, फ/द विभाग, मुंबई येथील पुनर्रचित इमारतीच्या नामकरणाच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

---

वरील विषयाचा प्रस्ताव पृ. क्र. १०१ वर सन्मा. सदस्यांच्या मंजूरी-साठी सादर करण्यात आला आहे.

चर्चेअंती वरील पुनर्रचित इमारतीस " रणवीर सदन" या प्रस्तावित नांवास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ५०/३८८.

पुनर्रचित तेजुकाया मॅन्शन-२, डॉ. आंबेडकर रोड, लालबाग, फ. द. विभाग, मुंबई या इमारतीस "रणवीर सदन " हे नांव देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

---

बाब क्रमांक : ५०/३. [उपमुख्य अधिकारी [सं. गा. ]

१] विषय- झोपडपट्टी पुनर्विकास योजनेसाठी वितरीत करावयाच्या संक्रमण शिबीरातील गाळयांना बाजारभावाप्रमाणे भाडे आकारणी करणे-बाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ. क्र. १०३ वर सादर करण्यात आला आहे.

यावर चर्चा करताना मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, एस. आर. ए. मध्ये ज्या पुनर्विकासाच्या मालमत्ता आहेत त्या मुख्यत: झोपडपट्टी विकास करावयाच्या मालमत्ता आहेत. ज्याठिकाणी सध्या झोपडपट्टी वसलेली आहे तेथून लोकांना हलवून त्या जागी नवीन इमारत बांधण्यात येते. त्या लोकांना मंडळाने संक्रमण शिबीरांचे गाळे द्यावेत असे शासनाचे आदेश आहेत. त्यानुसार मंडळाकडे उपलब्ध असलेले गाळे देण्यात येतात. परंतु अशी भिती आहे की, विकासक नाहरकत प्रमाणपत्र घेऊन मंडळाचे संक्रमण गाळे

घेईल व इमारत बांधणार नाही. हा धोका जर टाळावयाचा असेल तर विकसकाकडे तीन वर्षापेक्षा जास्त काळ संक्रमण गाळे रहाणार नाहीत असे बंधन घालावे. या गाळ्यांकरीता विकसकाकडून पहिल्यावर्षी प्रत्येक गाळ्यामागे दरमहा रु.२००/- दुसऱ्या वर्षी दरमहा रु.४००/- व तिसऱ्या वर्षी दरमहा रु.६००/- भाडे आकारण्यात यावे.

यावर मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असे मत व्यक्त केले की, सध्याचा बाजारभाव पहाता आपण याप्रमाणे जर भाडेवाढ करत गेलो तर ही योजना राबविण्यासाठी कोणी पुढे येणारच नाही.

यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, दरवर्षी भाडेवाढ करण्याची सूचना ही शासनानेच केलेली असल्यामुळे त्याप्रमाणे प्रस्तावित करण्यात आले आहे. विकसकांना बँकेमार्फत पैसे उपलब्ध करुनही देण्याचा विचार आहे. त्यामुळे विकसक फायदे घेऊन योजना करणार नाही हे टाळण्यासाठी सदर भाडेवाढीचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी यावर अशी सूचना केली की, विकसकाकडे आय.ओ.डी/सी.सी. असल्याशिवाय संक्रमण गाळे वितरीत करु नयेत आणि आय.ओ.डी./सी.सी. हातात आल्यानंतर १८ महिन्यांचा कालावधी साधारणत: नवीन इमारत पूर्ण करण्यासाठी लागतो. त्यामुळे मंडळाने त्यांना २४ महिन्यांचा कालावधी द्यावा व त्यांच्यावर बंधन घालावे की, २४ महिन्यांनंतर त्यांचा एकही भाडेकरु संक्रमण शिबीरात रहाता कामा नये. ही अट घातली तर मंडळास धोका रहाणार नाही.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, सदर योजना ही पुर्ती शासनाची आहे, त्यामुळे सखोल विचार करुनच यावर निर्णय घ्यावा लागेल. विकसकांना संक्रमण गाळे काही ठराविक मुदतीसाठी द्यावेत आणि त्या मुदतीनंतर गाळ्यांचे भाडे दुप्पट करावे.

उपसचिव श्री कोकणे यांनी असे मत व्यक्त केले की, शासनाने भाडेवाढ करण्यासाठी मंडळास विदित केलेले असेल तर दुरुस्ती मंडळाने शिफारस करुन शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. व त्या सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात नुसता बाजारभाव न म्हणता भाड्याचा आकडा निश्चित करण्यात यावा. कारण बाजारभाव म्हटला तरी डिस्क्रीशन रहाते ते रहाता कामा नये.

यावर मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, सार्वजनिक बांधकाम विभाग दरवर्षी मुंबईकरता इकॉनॉमिक रेंट आणि बाजारभाव [मार्केट रेंट], व्यावसायिक रेंट यांचे परिपत्रक काढते.

यावर उपसचिव श्री कोकणे यांनी असे सुचविले की, शासनाला

शिफारस करताना सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या दरवर्षीच्या दराचा संदर्भ देऊन शासनाला प्रस्ताव पाठविण्यात यावा. यावर मा. सभापती यांनी तशा सुधारणा प्रस्तावात करण्यात येतील असे आश्वासन दिले.

मा. सदस्य श्री सावरकर यांनी असे मत व्यक्त केले की, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरिता जी नवीन संक्रमण शिबीरे बांधण्यात येत आहेत ती संक्रमण शिबीरे तयार झाल्यानंतर मंडळाचे जे गाळे विकासकांना दिले आहेत ते मंडळास परत मिळणार आहे का? यावर मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, शासनाची अशी योजना आहे की, झोपडपट्टी पुनर्वसन योजना पूर्ण झाल्यानंतर हे२२५ चौ. फूटाचे गाळे हे जाहीरात देऊन नंतर अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गटातील लोकांसाठी देण्यात येतील.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, संक्रमण गाळे आपण रहिवाशांना देतो. परंतु काही कारणांनिमित्त रहिवाशी त्या गाळ्यांत रहात नसतील अशा लोकांना मंडळाकडून बाहेर काढले जाते आणि अनेक विनंत्या करुनही ते गाळे त्यांना परत दिले जात नाहीत. परंतु असे काही प्रसंग भाडेकरुंवर येतात की, त्यांना त्या गाळ्यांत रहाणे शक्य नसते. अशावेळी त्यांचे गाळे जर मंडळाने ताब्यात घेतले तर या लोकांनी रहावयाचे कोठे? त्यांचा जरी पुनर्रचित इमारतीतील हक्क अबाधित रहात असला तरी मंडळाच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणे सर्वच लोक पोटभाडेकरु ठेवत नसल्यामुळे मंडळाने याबाबत काही ठोस मार्ग काढावा की, जेणेकरुन रहिवाशांना काही त्रास होणार नाही. व त्याबाबत आजच्या बैठकीत विचार करावा अशी विनंती केली.

मुख्य अधिकारी यांनी वरील मताशी सहमती दर्शवून अशी माहिती दिली कीसंक्रमण शिबीराच्या पहाणीमध्ये ज्याला गाळा दिला आहे तो न रहाता तिऱ्हाईत इसम रहाताना आढळतो. अशाप्रकरणी मंडळ कडक कारवाई करते. कारण पुष्कळ लोक आर्थिक फायदा होण्यासाठी स्वत:च्या गाळ्यात पोटभाडेकरु ठेऊन गाळ्यांचा वापर करत असतात जर त्यांना त्या गाळ्यांत रहावयाचे नसेल तर तो गाळा कुलूप लाऊन दुसरीकडे राहू शकतात. परंतु जे भाडेकरु/रहिवाशी पोटभाडेकरु ठेवतात अशा लोकांकडून मंडळ गाळा खाली करुन घेते. संक्रमण शिबीरातील गाळा भाडेकरुंचा हक्क असतो असे नसून तो गाळा त्यांना त्यांच्या पर्यायी जागेची सोय म्हणून दिलेला असतो व या सोईचा जर गैरवापर होत असेल तर मग त्या भाडेकरु/रहिवाशावर कार्यवाही झालीच पाहीजे.

यावर मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, गाळ्यांचा गैरवापर होत असेल तर कारवाई करणे ठीक आहे. परंतु त्यांचेकडे एक उदाहरण असे आहे की, त्यांच्या माहितीमधील एक पती, पत्नी हे दोघेही कामावर आहेत. त्यांचे वडील गंभीर आजारी होते. त्यांच्याकडे पैसे नव्हते. वडीलांच्या ऑपरेशनसाठी पैसे तांतडीने उपलब्ध होणे गरजेचे होते. म्हणून त्यांनी त्यांचा गाळा भाड्याने दिला असे त्यांनी प्रामाणिकपणे कबूल केले. दरम्यान त्यांना मंडळाची नोटीस मिळाल्यानंतर पोटभाडेकरूस त्यानी त्वरित बाहेर काढले. व ते स्वत: गाळ्यात रहात होते. परंतु मंडळाच्या नोटीसला उत्तर द्यावयाचे असते हे त्यांना माहित नव्हते. एक दिवस ते पती पत्नी दोघेही कामावर असताना संबंधित भाडेवसुली-काराने त्या गाळ्याची शेजाऱ्याकडून चावी घेऊन गाळ्यातील भाडेकरूचे सामान बाहेर काढले आणि आज ती पती-पत्नी रस्त्यावर आहेत. अशीही परिस्थिती उद्भवत असल्यामुळे यातून असा काही मार्ग काढावा की, सर्वसामान्य माणसाला त्रास होणार नाही. असाच एका प्रकरणी ६० वर्षांच्या वृध्द बाईचा गाळा मंडळाने ताब्यात घेतला आहे. त्या बाईस कोणीही नाही. मंडळाने तिला कोर्टात जाण्यास सांगितले. तिचे कोणीही नाही व कोर्टात जाण्याची तिची ऐपतही नाही. अशा परिस्थितीत त्या बाईने काय करावयाचे? म्हणून मंडळातर्फे गाळा ताब्यात घेण्याची कारवाई केली जाते तेव्हा त्यापूर्वी गाळा भाड्याने दिला आहे अशी खात्री झाली तरच कारवाई करावी व संबंधित व्यक्ती परत गाळा मागण्यास येईल तेव्हा त्याच्यावर दंडात्मक कारवाई करावी किंवा त्याच्याकडून लेखी घ्यावे असा काहीतरी मार्ग काढावा. कामगार वस्तीतील गरजू लोकांना जर गाळ्या-बाहेर काढले तर ते लोक जाणार कोठे ?

यावर मुख्य अधिकारी यांनी असे आश्वासन दिले की, मा. सदस्य श्री सकपाळ यांनी आता निदर्शनास आणलेल्या प्रकरणी जर भाडेकरूंकडून अर्ज आले तर अशा प्रकरणांची गुणवत्ता पाहून निर्णय घेता येईल.

मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, भाडेकरूस पर्यायी गाळा अशासाठी देण्यात येतो की, त्याची जुनी इमारत पाडल्यानंतर त्याची दुसरीकडे रहाण्याची सोय नसते. परंतु निष्कासन कारवाई केल्यानंतर असे लक्षात येते की, त्या भाडेकरूस गाळ्याची गरज नसल्यामुळे त्याने तो तिऱ्हाईतास दिलेला आहे. परंतु त्या गाळ्याची भाडेकरूने पुन्हा मागणी केल्यास त्याच्याकडून लिहून घ्यावे की, त्याला त्या गाळ्याची गरज आहे व तोच त्या गाळ्यात राहील व त्याने पोटभाड्याने गाळा दिल्यापासून दरमहा त्याला रु.६००/- दंडात्मक भाडे लाऊन त्याला पुन्हा गाळा देता

९८

उपसचिव श्री कोकणे यांनी मुख्य अधिकारी यांच्या मताशी सहमती दर्शवून असे मत व्यक्त केले की, याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे कठीण आहे. जी वैयक्तिक प्रकरणे मा. सदस्यांच्या नजरेस येतील ती त्यांनी मुख्य अधिकारी यांच्या नजरेस आणावीत व मुख्य अधिकारी यांनी त्यावर गुणवत्तेनुसार निर्णय घ्यावा.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी निदर्शनास आणले की, अशा प्रकरणी निर्णय घेण्यासाठी मुख्य अधिकारी यांना अधिकार प्रदान करावेत व त्यांना जर योग्य वाटले तर त्यांनी त्या प्रकरणांचा साकल्याने विचार करून निर्णय घ्यावा अशी विनंती केली. यावर मा. सदस्यांच्या विनंतीनुसार वैयक्तिक प्रकरणी मुख्य अधिकारी यांनी त्यांच्या अधिकारात योग्य तो निर्णय घ्यावा या मतास सर्वानुमते सहमती दर्शविण्यात आली.

ठराव क्रमांक : ५०/३८९.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी वितरीत करण्यात यावयाच्या संक्रमण शिबीरातील गाळ्यांसाठी प्रचलित पध्दतीनुसार आर्थीक दराने भाडे न आकारता दरमहा बाजारभावाने भाडे आकारण्यात यावे. भाडेआकारणीचे सुधारित दर दि. १-१-९८ पासून अंमलात आणावेत.

यापूर्वी सदरहू योजनेखाली वितरीत केलेल्या गाळ्यांसाठीसुध्दा मुदतवाढ देताना सुधारितदराने भाडे आकारण्यात यावे.

यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली व सदर प्रस्ताव मंजूरीसाठी प्राधिकरणास सादर करण्याचे ठरले. तसेच उपकरपात्र इमारतीतील रहिवाशी/भाडेकरूंच्या संक्रमण शिबीरातील गैरवापराबाबतीतील गाळ्याबाबत प्रकरणनिहाय गुणवत्तेनुसार मु. अ/~~दु. व पु.~~ यांना अंतिम निर्णय देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

[२] विषय- संक्रमण शिबीरातील गाळ्यांच्या सेवाशुल्कात वाढ करणेबाबत.

वरील विषयाचा प्रस्ताव पृ. क्र. १०५ वर सादर करण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री भुवड यांनी असे मत व्यक्त केले की, सेवाशुल्कात जवळजवळ १०० टक्के वाढ दाखविलेली आहे. सदर विषयावर सविस्तर चर्चा होणे आवश्यक असून हा विषय पुढील बैठकीत घेण्यात यावा. या मताशी सहमती दर्शवून मा. सभापती यांनी श्री पाटील, मि. व्य. यांना सूचना दिल्या की, दरवर्षी सेवाशुल्कात रू. १०/-ची जी वाढ सुचविलेली आहे तो मुद्दा

यावर उपसचिव श्री कोकणे यांनी असे मत व्यक्त केले की, याप्रमाणे जर कारवाईस स्थगिती देण्यात येत असेल तर ही बाब शासनाच्या नजरेस आणावयास पाहीजे. यावर मा. सभापती यांनी निदर्शनास आणले की, शासनच स्थगिती देत असेल तर कोणाच्या नजरेस आणावयाची? मुख्य अधिकारी यांनी सदर स्थगितीबाबत शासनास माहिती आहे असे निदर्शनास आणले.

सविस्तर चर्चेअंती उपसचिव श्री कोकणे यांनी सुचविल्याप्रमाणे तक्त्यामध्ये अधिक माहिती अंतर्भूत करण्याचा निर्देश देऊन सदर अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.

---

बाब क्रमांक : ५०/४. [उपमुख्य अधिकारी/पु. गा.]

१] विषय- पुनर्रचित इमारतीमधील घुसखोरांनी व्यापलेल्या गाळ्यांचे न्यायालयीन/सक्षम प्राधिकारी/अपिल अधिकारी यांचेकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा दि. ३०. ११. ९७ पर्यंतचा गोषवारा.

........

वरील विषयाची माहिती पृ. क्र. १११ वर सादर करण्यात आली आहे.

मा. सदस्य श्री सावरकर यांनी निदर्शनास आणले की, कालिकादर्शन मधील घुसखोरीबाबत घुसखोर अपिल करु शकत नाहीत असा निर्णय न्यायालयात आलेला आहे. यावर मा. सभापती यांनी सदरची नस्ती मा. मुख्य मंत्री यांच्याकडे पाठविण्यात आल्याचे निदर्शनास आणून सर्वानुमते सदर अहवालाची नोंद घेण्यात आली.

---

२] विषय- परळ येथील भक्ती व अभंग या पुनर्रचित इमारतीतील रिक्त असलेले गाळे संक्रमण शिबीर म्हणून वापरात आणण्याबाबत.

---

उपरोल्लेखित प्रस्ताव पृ. क्र. ११५ वर सादर करण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी सदर गाळे हे संक्रमण शिबीर म्हणून वापरण्यात यावेत असे मत व्यक्त केले.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी विचारणा केली की, अरुंद भूखंडाशेजारील जुनी इमारत भाडेकरू खाली करत नसतील तर काय ? अरुंद भूखंडापैकी असेही काही भूखंड आहेत की, इमारतीचा अर्धा भाग रस्तारुंदीकरणामध्ये गेलेला आहे व अर्धा भाग जागेवर आहे. अशा इमारतीतील लोकांना सांगण्यात येते की, त्यांची इमारत पुनर्रचित होणार आहे, त्यामुळे त्यांना बृहतसूचीवर घेण्यात आलेले नाही. कारण पुनर्रचित विभागाकडून इमारत होणार आहे असे कळविण्यात आलेले आहे. यावर मा. सभापती यांनी त्यांच्याकडे अशी उदाहरणे दिल्यास त्या भाडेकरूंची नांवे बृहतसूचीत समाविष्ट करण्यात येतील असे आश्वासन दिले.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी विचारणा केल्यावरुन मा. सभापती यांनी माहिती दिली की, जर बृहतसूचीवरील लोकांना गाळे देऊ करुनही जर ते त्यांनी घेतले नाहीत तरी सदर गाळे रिक्त ठेवण्यात येणार नाहीत. मा. न्यायाधीश सुजाता मनोहर यांचा असा निर्णय आहे की, पुनर्रचित इमारतीतील गाळ्यांचा वापर उपकरपात्र इमारतींनी परिणामित झालेल्या लोकांसाठीच करता येईल. दुसऱ्या कोणाला ते गाळे देता येणार नाहीत.

मा. सदस्य श्री भूवड यांनी असे मत व्यक्त केले की, भक्ति आणि अभंग ह्या दोन इमारतीतील गाळे १६० चौ. फूटाचे असल्यामुळे ते रिक्त आहेत. आता १८० चौ. फू गाळ्यांच्या काही इमारती तयार असतील व नवीन धोरणाप्रमाणे २२५ चौ. फू गाळे होणार असल्यामुळे ते ही लोक १८० चौ. फूटाचे गाळे घेण्यास तयार होणार नाहीत.

यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, २२५ चौ. फू च्या गाळ्यांबाबत मंत्री मंडळासमोर जेव्हा निर्णय झाला तेव्हा असे ठरलेले आहे की, १८० चौ. फू चे गाळे बांधून तयार असलेल्या इमारतीतील लोकांना ते गाळे घ्यावे लागतील. व तसे आदेश शासनाकडून लौकरच प्राप्त होणार आहेत.

मा. सदस्य श्री तिकोने यांनी असे मत व्यक्त केले की, भक्ति आणि अभंग ह्या इमारतीतील ९०गाळे १९७८ पासून रिक्त आहेत. आणखी कोणत्या इमारतीत असे १६० चौ. फूटाचे गाळे रिक्त आहेत का? पूर्वी मंडळ १६० चौ. फूटाचे गाळे बांधत होते. आज १९९८ सालात १८० चौ. फूटाच्या गाळ्यांवरुन२२५ चौ. फुटाचे गाळे बांधण्याचे धोरण निश्चित झालेले आहे. तर १६० चौ. फूटाचे गाळे त्याच इमारतीतील गाळेधारक मागत असतील व बृहतसूची पूर्ण झाली असेल तर त्या लोकांना देण्यात काही गैर आहे असे वाटत नाही.

पुनर्बांधणी योजना होऊ शकते. सदर इमारतीतील भाडेकरु/रहिवाशी यांना त्यांच्या हिश्याची अधिक होणारी रक्कम रु.२,९६,०००/- भरण्यासाठी कळविण्यात आले होते, त्यापैकी त्यांनी रु.७६,०००/- भरलेले आहेत. परंतु बाकी रक्कम भरण्याची त्यांची ऐपत नाही. त्यामुळे त्यांनी भरलेली रक्कम त्यांना परत करण्यात येईल. पुढे त्यांनी असे निदर्शनास आणले की, पृ.क्र. द-३ वर अ.क्रमांक ६ वर भाडेकरुचे नांव अजय गुप्ता, रहिवाशाचे नांव अजय गुप्ता, कंसामध्ये नवीनभाई गुप्ता असे लिहिले आहे. त्यामध्ये सुधारणा करुन कंसामधील नाव खोडून टाकावे.

सविस्तर चर्चेअंती उपरोक्त इमारतीच्या ८८ [३] "अ" प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

---

२] विषय- दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतीच्या दुरुस्तीच्या कामाचे मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.

........

दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रकांचे प्रस्ताव मंजूरीसाठी पृ.क्र. द-५ ते द-२२९ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावांवर चर्चा करताना मा.सदस्य श्री उसपकर यांनी पृ.क्र. द-२९ वरील इ.क्र. २०२-२०४, डॉ.डी.एन. रोड बाबत असे निदर्शनास आणले की, क्षेत्रफळामध्ये फरक आहे.

यावर खुलासा करताना श्री वणीकर, उ.मु.अभि. यांनी सांगितले की, मागच्या टप्प्याच्यावेळी पिल्टअप एरियामध्ये एक रुम दाखविण्यात आली होती, ती ब्लॉकप्लॅनमध्ये नाही. म्हणून ती वगळण्यात आलेली आहे. सध्याचे क्षेत्रफळ हे मोजून घेतलेले आहे व ते बरोबर आहे. सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

इ.क्र. १७-१७-अ, एच.कावसजी पटेल रोड, बाहुबली चेंबरबाबत मा.सदस्य श्री भुवड यांनी असे निदर्शनास आणले की, वर्धमान चेंबरची तोसापटी झाली ती डिसेज करुन घेतली. बाहुबली चेंबरचा उपकर १५ लाख रुपये बाकी आहे म्हणून त्यांना आपण आता दुरुस्तीसाठी १४ लाख रुपये देत आहोत. एकदा का तिची दुरुस्ती झाली की, या इमारतीची सहकारी गृहनि.संस्था होईल व डिसेजसाठी ते अर्ज करतील.

.....१६/-

34

यावर मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, कोणतीही उपकरपात्र • निवासी किंवा अनिवासी इमारत ही कायद्याप्रमाणे दुरुस्त करावी लागते. उपकराचे पैसे हे भाडेकरूंनीच दिलेले असल्यामुळे ते त्यांचेच पैसे खर्च करीत आहेत.

यावर मा. सदस्य श्री भूवड यांनी सदर इमारतीस पहाणी करण्याची इच्छा प्रदर्शित केली.

मा. सभापती यांनी सदर इमारतीची पहाणी करण्याच्या अटीसह प्रस्ताव सर्वानुमते मंजूर केला.

मा. सदस्य श्री भूवड यांनी "बी" विभागातील प्रस्तावांबाबत असे मतव्यक्त केले की, "ब" विभागात बरीचशी अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. त्यामुळे दुरुस्तीच्या वेळी इमारतीचे क्षेत्रफळ मोजमाप करताना दखल घेण्याची अतिशय गरज आहे.

पृ. क्र. द-९१, इ. क्र. २२, पाकमोडीया स्ट्रीट, लकी बिल्डिंगबाबत मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे मत व्यक्त केले की, अधिक भरावयाची रक्कम भरण्यासाठी मंडळाने दि. २३. १२. ९६ व दि. १०. ५. ९७ ला पत्र दिलेले आहे. तरीही त्यांनी रक्कम भरलेली नाही. ही इमारत ८८[३]"अ" खाली का घोषित करण्यात येत नाही? यावर श्री वणीकर, उ. मु. अभि. यांनी असे मत मांडले की, सदर इमारतीचे अंदाजपत्रक मंजूर करून घेऊ व अधिकची रक्कम भरण्यासाठी त्यांना आणखी एक पत्र पाठविण्यात येईल. व त्यांनी पैसे नाही भरले तर ८८ [३] "अ" जाहीर करू.

पृ. क्र. १०३ वरील इ. क्र. ३१, सिध्दीलेन या इमारतीच्या प्रस्तावाबाबत बोलताना मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे निदर्शनास आणाले की, तळमजल्यावरील लोकांनी मोठ्या प्रमाणात इमारतीत बदल व बांधकाम केलेले आहेत त्यामुळे सदर इमारतीची पहाणी करण्यात यावी. सविस्तर चर्चेअंती इमारतीस भेट देण्याच्या अटीसह प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

पृ. क्र. द-१२५ वरील इ. क्र. ३३-३५, महादेव शंकर शेठ रोड बाबतचा प्रस्ताव मागे घेण्यास श्री वणीकर, उ. मु. अभि. यांनी परवानगी मागितली असता सदर प्रस्ताव मागे घेण्यास त्यांना सर्वानुमते परवानगी देण्यात आली. सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव सर्वानुमते मागे घेण्यात आला.

पृ. क्र. १७७ वरील इ. क्र. १२६, -१४४, फॉकलंड रोड या इमारतीच्या प्रस्तावाबाबत मा. सदस्य श्री उसपकर यांनी सदर इमारतीचे क्षेत्रफळ वाढले असल्याचे निदर्शनास आणाले असता श्री वणीकर, उ. मु. अभि. यांनी खुलासा केला की, ब्लॉकप्लॅनमध्ये सदर क्षेत्रफळ समाविष्ट असूनही मागील टप्प्याच्या वेळी ते घेण्यात आले नव्हते ते या टप्प्याच्यावेळी घेण्यात आलेले आहे. या माहितीनंतर सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

पृ. क्र. २११ वरील इ. क्र. २९३-२९५, ताडदेव रोड, जवेरी भुवन बाबत मा. सदस्य श्री उसपकर यांनी विचारणा केली की, या इमारतीचे १९९०-९१ ला तिसऱ्या टप्प्याचे काम झालेले आहे. सध्या या इमारतीचे मार्च-९७ पासून काम चालू आहे. यावर श्री वणीकर, उ. मु. अभि. यांनी खुलासा केला की, या इमारतीच्या चौथ्या टप्प्याचे अंदाजपत्रक १९९६ मध्ये मंजूर झालेले आहे. तशी नोंद प्रस्तावात घेण्यात आली पाहिजे होती व आता सादर करण्यात आलेले अंदाजपत्राक हे चौथ्या टप्प्याचे सुधारित अंदाजपत्रक आहे. परंतु चौथा टप्पा सुधारित असे लिहावयाचे राहून गेले आहे. वरील माहितीनंतर सदर प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

पृ. क्र. २२५ वरील इ. क्र. ३०६-अे, जावजी दादाजी रोड, रमेश भुवन या इमारतीच्या प्रस्तावात उपकराविषयी काही लिहिलेले नसल्याचे निदर्शनास आणले असता श्री वणीकर, उ. मु. अभि. यांनी खुलासा केला की, उपकर १९८३ पर्यंत भरलेला आहे. पुढचा उपकर भाडेकरूंनी घरमालकाकडे भरलेला आहे. त्याच्या पावत्या त्यांनी जमा करून घेतल्या आहेत. त्यांनी २६. १०. ९६ पर्यंतचा उपकर भरलेला आहे. इमारतीच्या एका बाजूची भिंत अतिशय धोकादायक आहे. त्यामुळे इमारतीस दुरुस्ती करण्याची गरज आहे. यावर मा. सभापती यांनी म. न. पा. चे संबंधित अधिकारी यांना असे आदेश दिले की, सदर उपकर वसुलीबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती पुढील बैठकीसाठी न थांबता त्यांना व मुख्य अधिकारी यांना देण्यात यावी व पुढील बैठकीतही सादर करण्यात यावी.

वरील सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

ठराव क्रमांक : ५०/३९१.

[अ] इ. क्र. १५, दुसरी सुतार गल्ली, सी. विभाग ही इमारत म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ [३] -अ नुसार घोषित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

[ब] दक्षिण परिमंडळातील परिशिष्ट "अ" मधील दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांवर सविस्तर चर्चा होऊन चर्चेत सर्व सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या सूचना व मांडलेल्या हरकतींच्या आधीन राहून सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---

३५

बाब क्रमांक : ५०/६. [उत्तर परिमंडळ.]

१] विषय- उत्तर परिमंडळातील मोडकळीस आलेल्या इमारतीच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

..........

वरील विषयाची बाब टिपणी पृ. क्र. उ-१ वर सादर करण्यात आली आहे.

मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, ज्या इमारतीसाठी प्रॉपिंगसाठी जेवढा खर्च येईल त्यामध्ये थोडे पैसे टाकून जर इमारतीची दुरुस्ती होत असेल तर प्रॉपिंग न करता दुरुस्ती करण्यात यावी.

यावर संबंधित उ. मु. अभि. [उत्तर] श्री भूवनदास यांनी माहिती दिली की, प्रॉपिंग आणि डिमॉलिशनचे पैसे दुरुस्तीच्या कामासाठी वळविण्यात आलेले आहेत. पुढे माहिती देताना त्यांनी सांगितले की, प्रॉपिंग आणि डिमॉलीशनचा एकूण खर्च रु. ६३.०० लाखाचा आहे. त्यापैकी रुपये ३२.०० लाख खर्च झालेले आहेत व अपेक्षित खर्च रु. ३०.०० लाखाचा आहे. आर्थिक वर्षाबाबत खुलासा करताना त्यांनी सांगितले की, प्रॉपिंगचे काम नोव्हें. १९९७ पासून सुरु होत असल्यामुळे आर्थिक वर्ष नोव्हें. १९९७ ते ऑक्टो. १९९८ येते. वरील माहितीनंतर सदर प्रस्तावास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

२] विषय- इ. क्र. ६४२-६४४, एन. एम. जोशी मार्ग, नूरमंझील, भायखळा या इमारतीच्या दुरुस्तीवर मान्यतेपेक्षा अधिक आलेल्या खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

---

वरील विषयाची बाब टिपणी मान्यतेसाठी पृ. क्र. उ-५ ते उ-७ वर सादर करण्यात आली आहे.

मा. सदस्य श्री उतपकर यांनी अशी विचारणा केली की, जास्त खर्च १२ टक्क्यांच्या वर गेला आहे. एवढा खर्च करण्यासाठी सुधारित अंदाजपत्राक सादर न करताच मान्यता कोणी दिली ? यावर संबंधित अधिकारी श्री भूवनदास यांनी खुलासा केला की, पहिल्या टप्प्याचा झालेला खर्च हा

अंदाजपत्रकात चुकीचा दाखविण्यात आला होता. व तिस-या टप्प्याचे अंतिम देयक नंतर तयार करण्यात आले.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणाले की, १२ टक्के जास्त खर्चासाठी सुधारित अंदाजपत्रक सादर करावयास पाहिजे होते. परंतु तसे न करण्यात आल्यामुळे तांत्रिक चूक झालेली आहे. यावर अधिकारी श्री भूवनदास यांनी निदर्शनास आणाले की, ठेकेदाराने जास्त काम केलेले नाही. परंतु पूर्वीच्या ठेकेदाराने केलेल्या कामाचे अंतिम बील आता तयार झाले आहे व त्याचा खर्च जास्त आलेला असून तो १० टक्के च्या आतच आहे.

मा. सभापती यांच्या सूचनेनुसार सदर प्रस्तावाची संक्षिप्त माहिती संबंधित का. अ. श्री चव्हाण यांनी सभागृहास दिली. सविस्तर चर्चेअंती मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, यापुढे अशाप्रकारे जादा खर्चास मंजूरी न घेता सुधारित अंदाजपत्रक बनवून मंजूरी घेण्यात यावी अशा सूचना देऊन सदर जादा खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

------

३] विषय- उत्तर परिमंडळातील उपकरपात्र इमारतीच्या दुरूस्तीच्या कामाचे मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.

........

उत्तर परिमंडळातील दुरूस्ती कामाचीअंदाजपत्रके पृ. क्र. उ-९ ते उ-२२७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

पृ. क्र. उ-१५ वरील इ. क्र. १२७-१२९, म्हातारपाखाडी रोड हया इमारतीच्या प्रस्तावाबाबत उ. मु. अभि. [उत्तर] श्री भूवनदास यांनी माहिती दिली की, या इमारतीचा उपकर महानगरपालिकेच्या रेकॉर्डप्रमाणे १९७२ पर्यंतच भरलेला आहे. परंतु भाडेकरूमात्र नियमित भाडे जमा करीत आहेत.

यावर मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असे मत व्यक्त केले की, सदर मालमत्ता म. न. पा. ने ताब्यात का घेतली नाही? मा. सदस्य श्री उतपकर यांनी असे निदर्शनास आणाले की, ही इमारत १९८५ मध्ये दुरूस्त केली तेव्हाही उपकर १९७२ पर्यंतच भरलेला होता. त्यावेळी कारवाई का करण्यात आली नाही?

मुख्य अधिकारी यांनी विचारणा केली की, ही इमारत दुरूस्त करण्याची खरोखरच आवश्यकता आहे का? जर घरमालक १९७२ पासून उपकर भरत नसेल तर या इमारतीची दुरूस्ती का करावयाची?

अंदाजपत्रके बनवून मंजूरी घेण्यात यावी असे ठरले.

[३] उत्तर परिमंडळातील परिशिष्ट "व" मधील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्तीच्या कामांच्या मुळ व सुधारित नकाशांना व अंदाजपत्रकांना मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या हरकती व सूचनांच्या आधारे प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.

---

बाब क्रमांक : ५०/७.

अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी घेण्यात येणारे प्रस्ताव.

---

[१] विषय- इ. क्र. ७५-७७, आणि ७९, म्हातारपाखाडी रोड, इ. विभाग येथील पुनर्रचना योजनेस प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

---

विषयांकित प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी सर्व सन्मा. सदस्यांना मंजूरीसाठी सादर केला.

सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. सभापती यांनी माहिती दिली की, मागील बैठकीत म्हातारपाखाडी रोड या इमारतीच्या पुनर्रचनेच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी मिळण्यासाठी प्रस्ताव ठेवण्यात आला होता. परंतु भाडेकरूंच्या नांवात बदल झालेला दिसून आल्यामुळे सदर प्रस्ताव मागे घेण्यात आला होता. आता सदर प्रस्तावात सुधारणा करण्यात आली असून तो आजच्या बैठकीत मंजूरीसाठी पुन्हा ठेवण्यात आला आहे. मा. सभापती यांनी का. अ. श्री पालीवाल यांना सूचना केली की, प्रस्तावित केल्याप्रमाणे जरी १८० चौ.फू. क्षेत्रफळाच्या गाळ्यांना मंजूरी घेण्यात आली तरी महानगरपालिकेकडे प्लॅन सादर करताना नवीन धोरणाप्रमाणे २२५ चौ. फू. गाळे करून घ्यावेत.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी सुचविले की, भाडेकरूंची यादी व्यवस्थीत तपासून पहावी. कोणत्याही भाडेकरूवर अन्याय होणार नाही याची काळजी घेण्यात यावी. मंडळाकडे माहिती उपलब्ध नसल्यामुळे कोणी घुसखोर त्याचा फायदा घेणार नाही याकडे अधिकाऱ्यांनी जातीने लक्ष द्यावे.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी प्रस्तावात २१ निवासी गाळे कमी होणार आहेत असे निदर्शनास आणले असता मा. सभापती यांनी माहिती दिली की, नवीन धोरणाप्रमाणे आता गाळे कमी होणार नाहीत.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित मालमत्तेच्या पुनर्रचना योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याचे सर्वानुमते ठरले.

---

[२] विषय- उत्तर परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या अंदाजपत्रक व नकाशांना प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

.......

मा. अध्यक्षांच्या परवानगीने उपमुख्य अभियंता [उत्तर] यांनी खालील इमारतींच्या दुरूस्तीचे तीन प्रस्ताव सर्व सन्मा. सदस्यांना सादर केले.

१] इ. क्र. ४५-अे, अफझल बिल्डिंग, सयानी रोड.

२] तय्यबजी मॅन्शन, डॉ. बाटलीवाला रोड,.

३] इ. क्र. १२, बिस्मील्ला बिल्डिंग, सेनापती बापट मार्ग.

वरील प्रस्तावांवर चर्चा करताना मा. सभापती यांनी सुचविले की, इ. क्र. ४५-अे, अफझल बिल्डिंग या इमारतीचे सुधारित अंदाजपत्रक उपकर पूर्ण करण्याच्या अटीवर प्रस्ताव मंजूर करण्याचे ठरले.

तय्यबजी मॅन्शन, डॉ. बाटलीवाला रोड, या इमारतीचा उपकर पूर्ण भरण्याच्या अटीवर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्याचे ठरले.

बिस्मील्ला बिल्डिंग, सेनापती बापट मार्ग या इमारतीचा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ५०/३९३

[१] इ. क्र. ७५-७७ आणि ७९, म्हातारपाखाडी रोड, इ. विभाग येथील पुनर्रचना योजनेस रु. ३१.३० लाख [भूसंपादनासह] एवढ्या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

उत्तर परिमंडळ :-

[२] उत्तर परिमंडळातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या दुरूस्तीच्या कामाच्या खालील अंदाजपत्रकांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

मंडळाची आहे, असे मत व्यक्त केले व अशा इमारतींची यादी मा. सदस्यांनी तयार करुन संबंधित अधिकाऱ्यांकडे द्यावी. यावर मा. सदस्य श्री सावरकर यांनी सांगितले की, दादर विभागातील राधाकृष्ण निवास व श्रीराम भवन या दोन इमारतींची अवस्था अतिशय वाईट आहे व त्यांनी स्वत: त्या इमारती पाहिल्या आहेत. खरेतर त्या इमारतींची अंदाजपत्रके या बैठकीत ठेवण्यात आली पाहिजे होती परंतु ती ठेवली गेलेली नाहीत.

यावर उपमुख्य अभियंता श्री भूवनदास यांनी असे निदर्शनास आणले की, त्यांच्याकडे बरीच अंदाजपत्रके पडून आहेत. सदर अंदाजपत्रकांना प्राधान्य देऊन ती सादर करण्यात येतील.

यावर मुख्य अधिकारी यांनी सुचविले की, अंदाजपत्रकांना प्राधान्य देताना ज्या इमारती धोकादायक असतील त्या इमारतींना पहिले प्राधान्य व इतर अंदाजपत्रकांना दुसरे प्राधान्य द्यावे. मा. सदस्यांनी सुचविलेल्या इमारतींना प्राधान्य देण्यात यावे. यास सर्व सन्मा. सदस्यांनी सहमती दर्शविली.

मा. सदस्य श्री सावरकर यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, अंदाजपत्रकाच्या प्रस्तावात वास्तुशास्त्रज्ञांचा खुलासा मागविण्यात आला आहे असा उल्लेख असतो. एका बैठकीत असे ठरले होते की, वास्तुशास्त्रज्ञांचा खुलासा आला आहे किंवा नाही अशी माहिती स्पष्टपणे देण्यात यावी. परंतु त्याप्रमाणे अद्याप प्रस्तावात माहिती देण्यात येत नाही.

मा. सदस्य श्री मोडक यांनी असे निदर्शनास आणले की, लोअर परेल येथील महावीर चाळ नं. १, जे. के. मार्ग या इमारतीचे काम अर्धवट राहीलेले आहे. सदर इमारतीच्या कामाची नस्ती अभिप्रायासाठी विधी सल्लागार/प्रा. यांच्याकडे दोन महिन्यांपूर्वीच पाठविण्यात आली आहे. त्यावर त्यांच्याकडून काहीही कार्यवाही न झाल्यामुळे ठेकेदारास आजपर्यंत बिल मिळालेले नाही. त्यामुळे इमारतीचे काम पुढे सुरु करता आलेले नाही. यावर उ.मु.अभियंता यांनी माहिती दिली की, सदर इमारतीचा ठेकेदार मृत्यु पावल्यानंतर त्या ठेकेदाराच्या वारस ठेकेदाराबाबत प्रस्ताव विधी सल्लागार/प्रा. यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. त्यांच्याकडून अजून अभिप्राय प्रलंबित आहे.

मा. सदस्य श्री मोडक यांनी असे निदर्शनास आणले की, वरळी येथे एक उपकरपात्र इमारत आहे. त्या इमारतीस मुंबई महानगरपालिकेने परस्पर परवानगी दिली आहे. सदर इमारतीवर एक माळा वाढविण्यात आला आहे याबाबत मंडळाने महानगरपालिकेस कळविले आहे. परंतु त्यांच्याकडून समाधानकारक असे उत्तर अजून मिळालेले नाही. तरी याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

..... २५

मा. सभापती यांनी सन्मा. सदस्य श्री तिकोने यांनी सूचना दिल्या की, ज्या उपकरप्राप्त इमारतींवर डिश अँटेना, जाहीरातींचे फलक लावण्यात आलेले आहेत अशा इमारतींना नोटीस देण्यास सुरवात करावी व जी काही कार्यवाही झाली असेल त्याबाबत पुढील बैठकीत अहवाल देण्यात यावा.

मा. सदस्य श्री तिकोने यांनी असे मांडले की, सध्या आचारसंहिता सुरू झालेली असल्यामुळे मा. सदस्यांनी आणलेल्या कामांच्या संदर्भात जर काही अडचणी नसतील तर आचारसंहितेचे कारण सांगून ती कामे करण्याचे टाळू नये. यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, प्रशासकीय दैनंदिन कामांना आचारसंहिता लागू नाही.

मा. सदस्य श्री भालचंद्र ठाकूर यांनी दि. १४ डिसें. १९९७ च्या महाराष्ट्र टाईम्समध्ये " गैरव्यवहाराबद्दल म्हाडाच्या ठेकेदारास अटक" अशी एक बातमी छापून आल्याचे सांगून त्या बातमीमध्ये असे म्हटले आहे की, काही काम न करता त्याने रू ११ लाख उखळले. यावर मा. सभापती यांनी उ. मु. अभि. श्री वणीकर यांना याबाबतची सद्यस्थिती देण्यास सूचना केली.

मा. सभापतींच्या आदेशानुसार श्री वणीकर, उ. मु. अभि. [द. ] यांनी दक्षिण परिमंडळातील सी-३, सी-५ विभागातील एम. आय. कुरेशी या ठेकेदराने दुरुस्ती कामांच्या बाबतीत गैरव्यवहार करुन काम न करताच पेमेंट घेतले असल्याबाबत संक्षिप्त माहिती सभागृहास दिली. त्यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, यापुढे असे प्रकार घडू नयेत यासाठी अधिकाऱ्यांना लेखी व मौखिक सूचना देण्यात आल्या आहेत . तसेच साधारणात: मागील . एक वर्षामध्ये जी काही कामे झालेली आहेत त्याबाबत तपासणी करण्यात यावी.

मा. सभापती यांनी असेमत मांडले की, बिलावरील सहया हया अधिकाऱ्यांच्या नाहीत हे प्रथमदर्शनी सिध्द झालेले आहे. कारण ज्याने त्या सहया केल्या त्याने तशी कबूली दिलेली आहे.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, इमारतीची दुरुस्ती करण्यास घेतल्यानंतर त्या इमारतीतील भाडेकरू संक्रमण शिबीरात पाठविले जातात. परंतु इमारतीची दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर भाडेकरू जुन्या इमारतीत रहावयास येतात व संक्रमण शिबीरातील खोलीही स्वत:च्या ताब्यात ठेवतात किंवा संक्रमण शिबीरात राहून जुन्या इमारतीतील खोली भाड्याने देतात. अशी अनेक उदाहरणे आहेत. याबाबत तपासणी करण्याचे मागे ठरले होते. त्याबाबत पुढे काय झाले त्याची माहिती द्यावी.

59

मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, इमारतीची पुनर्रचना किंवा दुरुस्ती होऊनही ज्या भाडेकरुंनी संक्रमण शिबीरातील गाळे खाली केलेले नाहीत त्या सर्वांना दंडात्मक रक्कम आकारण्यात आलेली आहे. दरमहा रु.६००/- दंडात्मक रक्कम आकारल्यामुळे ब-याचशा भाडेकरुंनी आपले गाळे खाली केलेले आहेत. संबंधित भाडेकरु हे दंडात्मक भाडे माफ करण्याबाबत मा. सभापती, मा. गृहनिर्माण मंत्री तसेच त्यांनाही भेटले होते. परंतु अजूनही त्यांचे दंडात्मक भाडे माफ करण्यात आलेले नाही. मात्र त्यांना दंडात्मक भाडे भरण्यासाठी हप्ते बांधून देण्याचे ठरले आहे. व तेवढेच त्यांना मंडळातर्फे आश्वासन दिलेले आहे.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असे निदर्शनास आणले की, बैठकीत जी दुरुस्तीची अंदाजपत्रके मंजूर केली जातात. पण ठेकेदारमात्र जे काम करणे अतिशय गरजेचे असते ते न करता इतर दुसरीच कामे करतो. व भाडेकरुंनी विचारणा केल्यावर निधी संपल्याचे व त्यामुळे काम शिल्लक राहील्याचे सांगतो. अशी अनेक उदाहरणे आहेत. यावर मा. सभापती यांनी सदर तक्रार गंभीर असून याबाबत खुलासा करण्यास श्री वणीकर, उ.मु.अभि. यांना सांगितले. श्री वणीकर, उ.मु.अभि.[द.] यांनी माहिती दिली की, दुरुस्तीसाठी घेण्यात येणा-या इमारतींची प्रथम संयुक्त पहाणी करण्यात येते. त्या पहाणीच्या वेळी वास्तुशास्त्रज्ञ व उपअभियंता उपस्थित असतात. त्यांना जो भाग प्रथमदर्शनी दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्याचे वाटते त्याप्रमाणे ते अंदाजपत्रक बनवितात. म्हणून अंदाजपत्रकात कॉंटिजेंसीस, ॲडीशनल वर्क यासाठी १० टक्के तरतुद करण्यात आलेली असते. अंदाजपत्रक मंजूर झाल्यानंतर व ठेकेदाराची नेमणूक झाल्यानंतर पुन्हा दुसरी संयुक्त पहाणी करण्याची पध्दत असते. या दुस-या पहाणीच्यावेळी मंडळाचे का.अ., उपअभियंता व वास्तुशास्त्रज्ञ आणि रहिवाशांचे प्रतिनिधी उपस्थित असतात. त्यावेळी प्रत्यक्ष किती कामे करणे आवश्यक आहे हे ओपन करुन पाहीले जाते. अशावेळी अंदाजपत्रकात जेवढे काम करणे आवश्यक आहे असे दाखविलेले असते, त्यापेक्षा अधिक काम ओपन केल्यामुळे निघण्याची शक्यता असते किंवा जी भिंत वरवर पाहीली असता धोकादायक वाटत नाही ती दुस-या पहाणीच्यावेळी मात्र धोकादायक दिसून येते. व त्यामुळे ते काम प्रथम केल्याशिवाय इतर कामे करणे शक्य होणार नाही असे दिसून येते. त्यामुळे अशाप्रकारचे बदल हे का.अ. यांच्या सल्ल्याने साईडवर करावे लागतात.

मा. सदस्य श्री तकपाळ यांनी अशी सूचना केली की, ज्यावेळी मा. सदस्यांच्या असे निदर्शनास येईल की, ठेकेदार आवश्यक ते काम करत नसल्यास भाडेकरूंनी संबंधित अधिका-यांना नेऊन सदर बाब त्यांच्या निदर्शनास आणावी व अधिका-यांमार्फत ठेकेदारावर दबाव आणण्यात यावा असे वाटते.

मा. सभापती यांनी असे सुचविले के, वास्तुशास्त्रज्ञ, कार्यकारी अभियंता व उप अभियंता हे दररोज कामाची पहाणी करत असतात. त्यामुळे त्यांनी मंडळाच्या अंदाजपत्रकाप्रमाणे आवश्यक ते काम केले जाते किंवा नाही हे पाहीले पाहिजे.

मुख्य अधिकारी यांनी निदर्शनास आणले की, हडदरे समितीचा अहवाल मा. राज्य मंत्री [गृ. नि.] श्री राज पुरोहित यांना सादर करण्यात आला होता. त्या अहवालाप्रमाणे जर अंमलबजावणी केली तर मा. सदस्यांनी निदर्शनास आणलेल्या सर्व गोष्टी टाळता येतील. अहवालाप्रमाणे उप अभियंता यांनी आठवडयातून तीन वेळा इमारतीची पहाणी करावयाची व पहाणी करण्याचे दिवस त्याने जाहीर करावयाचे. संबंधित भाडेकरूंना पहाणीच्यावेळी हजर रहाण्यासाठी कळविणे आवश्यक असते. जी दुरुस्ती होणार असते त्याबाबत पहिल्यांदा भाडेकरूंना माहिती देणे आवश्यक असते.

मा. सदस्य श्री मोडक यांनी जर ठेकेदार अंदाजपत्रकाप्रमाणे काम करत नसेल व काम अर्धवट सोडून जात असेल तर मा. सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे त्या ठेकेदारावर दडपण आणले पाहिजे असे सुचविले.

मा. सभापती यांनी विचारणा केली की, आतापर्यंत किती वास्तुशास्त्रज्ञांवर कारवाई करण्यात आली आहे? त्यांचे पेमेंट रोखून धरले आहे का? यावर श्री वणीकर, उ. मु. अभि. यांनी माहिती दिली की, ४० ते ५० वास्तुशास्त्रज्ञांवर कारवाई करुन त्यांची यादी मागे सादर केलेली होती असे निदर्शनास आणले. तसेच डी-२ विभागाच्या एका वास्तुशास्त्रज्ञाला पेनल्टी लाऊन त्यांची फी कापून घेण्यात आली आहे. तसेच त्यांना पुढे कोणतेही काम यावयाचे नाही असे आदेशही देण्यात आलेले आहेत. व तसा रेकॉर्ड उपलब्ध असून आवश्यक वाटल्यास सदर रेकॉर्ड माहितीसाठी सादर करण्यात येईल.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असे निदर्शनास आणले की, संक्रमण शिबीरात कल्याणकेंद्र बांधण्यासाठी मंडळाकडून ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले. त्यांच्या माहितीप्रमाणे यापूर्वी कधीही समाज कल्याण केंद्रासाठी मुंबई महानगरपालिकेकडून मान्यता घेण्यात यावी अशी अट ना हरकत प्रमाणपत्रात घालण्यात आलेली नव्हती. परंतु वडाळा संक्रमण

.....२८

५६

शिबीरात मा. खासदार श्री नारायण आठवले यांच्या फंडातून समाज-कल्याण केंद्र बांधण्यासाठी मात्र देण्यात आलेल्या ना हरकत प्रमाणपत्रामध्ये एक नवीन अट घालण्यात आली आहे की, या समाजकल्याण केंद्रासाठी महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाकडून मान्यता घेण्यात यावी. यापूर्वी मा. खासदार, मा. आमदार, मा. नगरसेवक यांच्या निधीतून मंडळाच्या जागेवर समाजकल्याण केंद्र बांधण्यात आली परंतु त्यावेळी नाहरकत प्रमाणपत्रामध्ये मुंबई महानगरपालिकेची मान्यता मागण्यात आली नव्हती. याप्रकरणी मात्र ना. ह. प्र. मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, इमारत प्रस्ताव विभागाकडून प्लॅन मंजूर करुन घेण्यात यावे. येत्या मार्चमध्ये सदर खासदार निधीची मुदत संपत असून मंडळाकडून तो महानगरपालिकेकडे नुकताच प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, हा विषय मुंबई मंडळाच्या भूशाखेशी संबंधित आहे. दुरुस्ती मंडळाप्रमाणेच मुंबई मंडळाच्या बैठकीतही ना हरकत प्रमाणपत्रांना मंजूरी दिली जाते. जी कामे आमदार निधीतून किंवा खासदार निधीतून व्हावयाची असतात त्यासाठी एक समिती आहे. सदर समिती जिल्हा मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात संबंधित मा. मंत्री महोदयांबरोबर बैठक घेतली जाते. त्यावेळी संबंधित आमदारहे त्यांच्या निधीतून काम करण्यासाठी लिहून देतात. मुंबई मंडळाकडून देण्यात येणाऱ्या नाहरकत प्रमाणपत्रातील अटी व शर्तींमध्ये मा. सदस्यांनी सांगितलेली अट समाविष्ट असते. त्या अटीनुसार बिल्डिंग प्लॅन मंजूर करण्याची जबाबदारी ही मुंबई महानगरपालिकेकडून मान्यता घेउन करावी. ही अट प्रत्येक नाहरकत प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली असते. दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्र शासनाच्या नियोजन खात्याने याबाबत कार्यपध्दती निश्चित करुन दिलेली आहे. त्या कार्यपध्दतीमध्ये मुंबई महानगरपालिका ही प्लॅनिंग ॲथॉरिटी असल्यामुळे कोणत्याही प्रकारचे बांधकाम करताना म. न. पा. चे नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक असते.

यावर मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, खासदार निधीतून काम करण्याच्या प्रस्तावात पैसे खासदारांचे, व जागा मंडळाची असल्यामुळे मंडळाने नाहरकत प्रमाणपत्र प्रदान केलेले असते. म. न. पा. ने फक्त चटईक्षेत्र निर्देशांक व इतर डी. सी. रूल्स पाळले आहेत किंवा नाहीत एवढेच पहावयाचे असते. म्हणून सदर प्रकरणी लौकरच म. न. पा. कडून कार्यवाही करुन घ्यावी अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री भूवड यांनी असे निदर्शनास आणले की, कुलाबा संक्रमण शिबीरात १० अनिवासी गाळे व-याच वर्षांपासून रिक्त पडून आहेत व मागील काही बैठकांमध्ये सदर बाब निदर्शनास आणून देण्यात आलेली आहे.. यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, सदर अनिवासी गाळ्यांबाबत वर्तमानपत्रात लौकरच जाहीरात प्रसिध्द होईल तसेच सायन येथील अनिवासी गाळे हे मुंबई मंडळाच्या जागेत असल्यामुळे त्याबाबतही वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात येईल.

मा. सदस्य श्री भूवड यांनी असे निदर्शनास आणले की, कुलाबा संक्रमण शिबीरात अनधिकृत फेरीवाले बाढलेले आहेत. त्याबाबतही मागील बैठकीत प्रश्न उपस्थित केला होता.

उपसचिव श्री कोकणे यांनी असे मत व्यक्त केले की, जर म्हाडाच्या जमिनीवर अनधिकृत बांधकाम करून धंदा करण्यात येत असेल तर ते अनधिकृत बांधकाम काढण्याची जबाबदारी मंडळाची आहे. यावर संबंधित अधिकारी यांनी माहिती दिली की, संबंधित अनधिकृत बांधकामाबाबत महानगर-पालिकेस कळविण्यात आलेले आहे. पोलीसातही तक्रार केलेली आहे.

मा. सदस्य श्री भूवड यांनी असे निदर्शनास आणले की, ते रहात असलेल्या इ.क्र. ४० ला लागूनच तीन झोपड्या बांधण्यात आलेल्या आहेत. यावर मा. सभापती यांनी सदर अनधिकृत बांधकाम काढण्याची कारवाई लवकरात लवकर करण्यात यावी अशा सूचना संबंधित कार्यकारी अभियंता यांना दिल्या.

मा. सदस्य श्री भूवड यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, २३-ई, आवा वाडी या इमारतीच्या दुरूस्तीसाठी सध्या अटकेत असलेला ठेकेदार कुरेशी यालाच नेमण्यात आले होते. मा. मंत्री महोदय श्री नवलकर यांनी आमदार निधीतून ५ लाख रुपये त्या इमारतीसाठी दिले होते. त्यासंबंधीच्या पत्रात असे स्पष्ट लिहिलेले आहे की, सामाईक व्हरांडा आणि छप्पर यांच्याकरिताच सदर रक्कम वापरण्यात यावी व रू. ५ लाख वापरण्यात आले की नाहीत? याबाबत पुढे काहीच कळलेले नसून सदर इमारतीचा व्हरांडा व छप्पर आजही तसेच ठेवण्यात आले आहे. कसलीही दुरुस्ती करण्यात आलेली नाही. तद्नंतर श्रीराम कन्स्ट्रक्शन यांना ते काम दिले असून तो ठेकेदारही काम करत नाही. त्याला आणखी पैसे पाहिजेत. संबंधित अधिकारी श्री त्रिवेदी, व. विभाग यांनी माहिती दिली की, पूर्वी कुरेशी एजन्सीला दिलेले काम काढून घेण्यात आले होते. सदर कुरेशी ही व्यक्ती सध्या अटकेत असलेली व्यक्तीआहे किंवा नाही याची त्यांना माहिती नाही. परंतु श्रीराम कन्स्ट्रक्शन यांना सदर दुरूस्तीचे

काम देण्यात आले होते व आमदार फंडातून व मंडळाच्या फंडातून काम करण्यात आले असून कॉमन व्हरांडा व पायऱ्यांचे काम व्यवस्थीत झाल्याचे ८ दिवसांपूर्वीच केलेल्या पहाणीत त्यांना दिसून आले आहे. या माहिती-नंतर मा. सदस्य श्री भूवड यांनी सदर इमारतीस संयुक्त भेट देण्याची इच्छा प्रगट केली. त्यास मा. सभापती यांनी सहमती दर्शविली.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी ४, मेढेकर हाउस, कुलाबा या इमारतीच्या संदर्भात वर्षापूर्वी वास्तुशास्त्रज्ञ श्री खाडीलकर यांचा प्लॅन दिलेला होता. पुढे त्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली याबाबत काही माहिती देण्यात आलेली नाही.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, या इमारतीची पुनर्बांधणी शक्य नाही असे त्यांना पत्रा पाठविण्यात आले होते. परंतु रहिवाशांच्या वास्तुशास्त्रज्ञांचेमते पुनर्बांधणी शक्य आहे. यावर मा. सदस्य श्री उसपकर यांनी सदर वास्तुशास्त्रज्ञ हा खाजगी नसून मंडळाचाच असल्याचे निदर्शनास आणाले.

यावर श्री परब, उ. मु. अभि. यांनी माहिती दिली की, दोन्ही इमारतींच्या बाजूने सेटबॅक सोडला तर पुनर्बांधणी शक्य आहे व त्याबाबत महानगरपालिकेला कळविण्यात येईल व त्यांनी जर तशी विशेष बाब करून परवानगी दिली तर पुनर्बांधणीचा विचार करता येईल. शेजारची इमारत घेऊन पुनर्बांधणी करण्याचे जरी ठरविले तरी म. न. पा. ने तेथे सुलभ शौचालय बांधले आहे. आता त्या सुलभ शौचालयाचे खासदार फंडातून रिनोव्हेशन करण्यात येणार असल्याचे त्यांना कळले आहे. असे असेल तर पुनर्बांधणी शक्य होणार नाही.

यावर मा. सभापती यांनी श्री परब यांना सूचना दिल्या की, अधिकृतपणे मा. सदस्यांना उत्तर देण्यात यावे.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे निदर्शनास आणाले की, करंदीकर समितीच्या संदर्भामध्ये एक विशेष बैठक घेण्यात येणार होती. यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, मा. अध्यक्ष/प्राधिकरण श्री अवचट साहेब यांनी सांगितले की, प्राधिकरणाच्या बैठकीत त्याची चर्चा करून मंडळास नंतर कळविण्यात येईल.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी पुढे असे निदर्शनास आणाले की, काळबादेवी येथील दुर्घटनाग्रस्त गणेशभूवन ही इमारत पुनर्रचित करणे शक्य आहे किंवा कसे याबाबत श्री करंदीकर यांनी काही सूचना दिल्या आहेत. त्याबाबत श्री हडदरे, मुख्य अभियंता यांचा काही रिपोर्ट आला आहे का? यावर उपमुख्य अभियंता श्री परब यांनी माहिती दिली की, श्री करंदीकर मुख्य अभियंता यांच्याकडून मुख्य अधिकारी यांच्यामार्फत मार्गदर्शन

मागविण्यात आलेले आहे.

मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, गणेश भुवनच्या पुनर्बांधणीच्या संदर्भात जे प्लॅन आणि अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे त्यानुसार ते नेहमीच्या लोखंडी कॉलममध्ये बांधण्याचे ठरलेले आहे. त्याप्रकारे ते बांधकाम करावे की न करावे याबद्दलची प्रशासकीय मंजूरी घेण्यापूर्वी श्री करंदीकर यांचा या विषयी सखोल अभ्यास असल्यामुळे सदर अंदाजपत्रकावर श्री करंदीकर यांचेही मत घ्यावे असे ठरले. म्हणून सध्या र नस्ती श्री करंदीकर यांच्याकडे पाठविण्यात आली आहे.

मा. सभापती यांनी निदर्शनास आणले की, श्री राज पुरोहित, मा. राज्य मंत्री [गृ. नि.] यांच्या व तेथील लोकांच्या आग्रहामुळे सदर इमारत लवकर बांधण्यात येईल असे त्यांना आश्वासन देण्यात आलेले आहे. त्यामुळे त्यांचे काही गैरसमज होणार नाहीत याची काळजी घ्यावी.

यावर मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे निदर्शनास आणले की, करंदीकर समितीच्या अहवालाविरोधात मंडळ कार्यवाही करेल का?

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, करंदीकर समितीच्या अहवालात असे म्हटले आहे की, ज्या पध्दतीने कोसळलेली इमारत पुनर्रचित करण्यात आली आहे ती आर. सी. सी. मध्ये बाजूचे वातावरण, अरुंद गल्ली, अशाठिकाणी भविष्यात बांधकाम करू नये.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे निदर्शनास आणले की, सदर कामाचे कोणत्याही वर्तमानपत्रात जाहीरात न देता निविदा मागविल्या गेल्या कशा? याबाबत त्यांना एका ठेकेदाराने माहिती दिली आहे की, सदर कामाचे टेंडरसुध्दा विक्री केली गेली आहेत. तरी याबाबत चौकशी करण्यात यावी अशी त्यांनी मागणी केली.

यावर संबंधित अधिकाऱ्यांनी सदर बाबत वृत्तपत्रामध्ये जाहीरात दिली नसल्याचे निदर्शनास आणले.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी पुढे विचारणा केली की, रोपा लेन व वाळकेश्वर बाबत पुढे कार्यवाही करण्यात आली का? यावर श्री नरद यांनी माहिती दिली की, याप्रकरणी काही माहिती मागविण्यात आली असून ती प्राप्त झाल्यावर प्रकरण मुख्य अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात येईल.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, श्री फिरंगे नांवाचे गृहस्थ आहेत. ते सध्या सायन कोळीवाडा येथील संक्रमण शिबीरात रहात असून त्यांच्या कामाठीपूरा येथील इमारतीतील गाळे वाटपासाठी दोनवेळा सोडत काढण्यात आली. परंतु त्यांचा नंबर लागला

नाही. त्यामुळे त्यांचे नांव बृहत्सूचीवर घेऊन गाळेवाटप करावयाचे आहे. न्यायालयाने ४ आठवड्यात सदर व्यक्तीस बृहत्सूचीवर घेण्यात यावे असे आदेश दिले आहेत. परंतु न्यायालयाचे आदेश असूनही मंडळ त्यांना बृहत्सूचीवर घेत नाही. त्याबाबत अडचण काय आहे? अशी विचारणा केली.

यावर मा. सदस्यांना त्यांच्याकडील पत्राची प्रत श्री मोरे, उपमुख्य अधिकारी[पु.गा.] ह यांना देण्यास सांगून श्री मोरे यांनी पुढील योग्य ती कार्यवाही करावी अशा सूचना मा. सभापती यांनी दिल्या.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे मत मांडले की, कर्मचारीवर्ग कमी असल्याचे जाणवते. सहाय्यक विधी सल्लागार यांचे पद विभागीय कार्यालयात उपलब्ध करून देण्याचे ठरले होते. त्याबाबत पुढे काय कार्यवाही झाली. मुख्य अधिकारी यांनी यावर माहिती दिली की, कर्मचा-यांची भरती करण्याबाबत शासनाकडून परवानगी मिळालेली असतानाही प्राधिकरणांकडून कर्मचारी भरले जात नाहीत. प्राधिकरणाचे असे मत आहे की, कर्मचारी भरतीचे निकष पहाता पुरेसा कर्मचारीवर्ग उपलब्ध आहे. दुसरे असे की, निवडणुकीच्या कामासाठी बरेचसे कर्मचारी गेलेले आहेत. त्यांनी उपस्थित सर्व अधिका-यांना सूचना दिल्या की, त्यांच्या कार्यालयातील किती कर्मचारी कधीपासून निवडणुकीच्या कामासाठी बाहेर आहेत याबाबत त्यांना माहिती देण्यात यावी म्हणजे सदर बाब ते शासनाच्या निदर्शनास आणतील.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे निदर्शनास आणले की, डी-२ विभाग या कार्यालयाचा दूरध्वनी नेहमी बंद असतो म्हणून दूरध्वनीची बिले वेळेवर भरण्याबाबत लेखा विभागास सूचना द्यावी. त्याप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना मा. सभापती यांनी संबंधितांना दिल्या.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे निदर्शनास आणले की, ९८, तात्या घारपुरे पथ बाबत ८-१० दिवसांत निर्णय होईल असे मागील बैठकीत सांगण्यात आले होते. यावर स.वि.स./प्रा. यांनी माहिती दिली की, याबाबत कार्यवाही चालू असून आठ दिवसांत कार्यवाही करण्यात येईल.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असा मुद्दा मांडला की, तेजुकाया ही इमारत व तेथील जागा ही एकाच मालकाची मालमत्ता असल्यामुळे तेथील रहिवाशांसाठी बाजूला जे दोन संडास बांधण्यात आले

होते ते पुढील इमारतीचे पुनर्रचनेचे काम पूर्ण होईपर्यंत तोडण्यात येऊ नयेत, अशी मागणी केली.

यावर मा. सभापती यांनी श्री पालीवाल यांना सूचना दिल्या की, संडास तोडल्यास रहिवाशांची गैरसोय होणार आहे. म्हणून तेजुकाया इमारतीचे काम पूर्ण होईपर्यंत सदर संडास न तोडण्याबाबत महानगरपालिकेस कळविण्यात यावे.

मा. सदस्य श्री सावरकर यांनी निदर्शनास आणाले की, तेजुकाया इमारतीच्या मालकाला अद्यापपर्यंत नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही असे त्या मालकाने कळविले आहे. त्यामुळे तो कोणत्याही क्षणी कोर्टात जाऊन स्थगिती आणण्याची शक्यता आहे. यावर मा. सभापती यांनी या विषयाबाबत मुख्य अधिकारी यांना पत्र देण्यास त्या मालकाला सुचवावे असे सांगितले.

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती यांनी नवीन वर्ष सर्वांना सुखाचे व समृध्दीचे जावो अशा शुभेच्छा व्यक्त करून सर्वांचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहीर केले.

सही/-
सचिव/मुं. इ. दु. व. पु. मं.

सही/-
मुख्य अधिकारी/मुंइदुवपुमं.

सही/-
मा. सभापती/मुंइदुवपुमं.

[ परिशिष्ट "अ" ]

**दिनांक ३०.१२.१९९७ रोजी झालेल्या मंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यांत आलेल्या दक्षिण परिमंडळातील दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकांची यादी.**

| अ.क्र. | इमारतीचा तपशिल. | दुरुस्तीचा टप्पा मंडळ/ नाहम्र. | मजल्यांची संख्या / रहिवाश्यांची संख्या. | बांधकाम क्षेत्रफळ / दुरुस्तीचा दर. | अंदाजपत्रकाची एकुण रक्कम. / निव्वळ टप्प्याची रक्कम. | रु.७५०/-प्रति चौ.मी.मर्यादितील रक्कम. | जादा रक्कम. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |
| | **"अ" विभाग :-** | | | | | | | |
| १] | ९२-९८ मोदी स्ट्रिट. | दुसरा मंडळ. | तळ+-३+-भाग४ / १३+-३=१६ | ११४२.७६ / ६९१.७५ | ७९०५०८/- / ३७२७५३/- | ३७२७५३/- | — | मंजुर. |
| २] | १२-१६ अ शाहिद भगतसिंग रोड. | पहिला मंडळ. | तळ +- ४ / ६६+-१०=७६ | १५९८.४८ / ३५३.८४ | ५६५३५७/- / ५६५३५७/- | ५६५३५७/- | — | मंजूर. |
| ३] | ३ जीवाजी लेन. | दुसरा मंडळ. | तळ+-२+-३भाग / ४+-२०=२४ | ७८६.०० / ५८१.९१ | ४५७३८३/- / ४३२३८२/- | ४३२३८२/- | — | मंजूर. |
| ४] | २०२-२०४डॉ.डी.एन.रोड. | दुसरा मंडळ | तळ+-३व तळ+-५ / २+-३२ = ३४ | ३८६९.४८ / ५३१.१७ | २०५५३७१/- / १५९१७१९/- | १५९१७१९/- | — | मंजूर. |
| ५] | १७-१७-अ-१७ एच,कावसजी पटेल स्ट्रिट. | तिसरा मंडळ. | तळ+-३+-भाग ३ / ३+-११=१४ | ३०५५.३१ / ७२३.४३ | १४८६८९०/- / ११५७५२४/- | ११५७५२४/- | — | मा.सदस्य श्री.भुवड व श्री.मु.अ/दु.व पु. यांच्या पहाणीस करण्याच्या अटीस राहुन मंजूरी देण्यांत आली. |

4119735/-

६४

"बी"विभाग.

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १] | १३९-१४१ नागदेवी स्ट्रिट. | दुसरा<br>मंडळ | तळ + ३<br>८+११=१९ | ६९२.००<br>६६६.२९ | ४६१५६०/-<br>३४९५६०/- | ३४९५६०/- | --- | मंजूर. |
| २] | ६,१ला फॉल्क रोड [शकील भुवन]. | दुसरा [ब]<br>मंडळ. | तळ + ४<br>२३+४=२७ | १५२४.६४<br>७०६.२३ | १००६७४२/-<br>८४६७४९/- | २६०७३५/- | --- | मंजूर. |
| ३] | ७ काझी सय्यद स्ट्रिट.. | दुसरा<br>मंडळ. | तळ + ३<br>११ +२=१३ | ३५९.१७<br>७२९.१४ | २६१८८७/-<br>१८५८८७/- | १८५८८७/- | --- | मंजूर. |
| ४] | १६८-१८० शारिदा मार्ग किंवा ९९ सॅम्युअल स्ट्रिट. | तिसरा<br>मंडळ. | तळ + ३<br>५८+२०=७८ | २३६३.००<br>५२९.५५ | १२५१६००/-<br>४६८२७६/- | ४६८२७६/- | --- | मंजूर. |
| ५] | १४३/१४५ शायदा मार्ग. | तिसरा<br>मंडळ. | तळ + ४<br>३७+१=३८ | १५३१.४२<br>६७७.०२ | १०३००४३/-<br>६८८६४१/- | ६८८६४१/- | --- | मंजूर. |
| ६] | १८७-१९१ नागदेवी स्ट्रिट. | पहिला<br>मंडळ. | तळ + ४<br>९+७=१६ | ६८८.५१<br>७४७.२१ | ५१४४६२/-<br>५१४४६२/- | ५१४४६२/- | --- | मंजूर. |
| ७] | १५६-१५८ नागदेवी स्ट्रिट. | तिसरा<br>मंडळ. | तळ + ५<br>१२+५=१७ | ९८४.००<br>७४९.२७ | ७३७२८९/-<br>४३२४९९/- | ४३२४९९/- | --- | मंजूर. |
| ८] | १५४,सॅम्युअल स्ट्रिट.. | पहिला.<br>मंडळ. | तळ + ४<br>१+६=७. | ४८५.९४<br>५९३.४४ | २८८३७९/<br>२८८३७९/- | २८८३७९/- | --- | मंजूर. |
| ९] | २५६-२५८ नरसीनाथा स्ट्रिट. | तिसरा.<br>मंडळ. | तळ + ४<br>५०+१६=६६ | १५४१.१५<br>७५६.१५ | ११६५३४४/-<br>८९०३४४/- | ८८०८६६/- | ९४७८/- | मंजूर. |
| | | | | | ६७८७२५३/-<br>४६६४७९७/- | ४०६९२५२/- | ९४७८/- | |

8/ 64532

ती-१/२ :-

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १] | ४०८-४१२ फॉकलंड रोड. | चौथा. / मंडळ. | तळ + ५ / १२१+३९=१६० | ५०२८.०० / ३७३.३४ | १८७७१५८/- / ५९२१६४/- | ५९२१६४/- | — | मंजूर. |
| २] | ११ अर्देशिर दादी छेद गल्ली. | तिसरा / मंडळ. | तळ + २ / १७+७=२३ | ९२०.०० / ७४२.४५ | ६८३०६०/- / ४०७०६०/- | ४०७०६०/- | — | मंजूर. |
| ३] | ४४-४४ अ, दुसरा भोईवाडा. | दुसरा / मंडळ. | तळ + ३ / ३+१ = ४ | ३००.७० / ७३८.२५ | २२२००२/- / १६२००२/- | १६२००२/- | — | मंजूर. |
| ४] | १४/२२ पाकमोडिया स्ट्रिट[लकी बिल्डिंग] | चौथा / मंडळ. | तळ + ४ / ३४+८=४२ | १४७९.०० / ८४४.२९ | १२४८७१०/- / ५८८१५३/- | ४४८६९८/- | १३९४५५/- | मंजूर. |
| ५] | ५८ सैफ ज्युबिली स्ट्रिट.. | दुसरा / मंडळ. | तळ + ५ / ११+१=१२ | ३५५.५५ / ९४२.४५ | ३३५०८७/- / ११५०८७/- | ४६६६२/- | ६८४२६/- | मंजूर. |
| ६] | ८८, दुर्गादेवी स्ट्रिट.. | तिसरा / मंडळ. | तळ + ३ / १७+६=२३ | ६२०.४८ / ९९०.०३ | ६१४३९३/- / ४११२१३/- | ~~२६२२५६/-~~ | १४८९५७/- | मंजूर. |
| ७] | २९ सैफि ज्युबिली स्ट्रिट.. | तिसरा / मंडळ | तळ + ३ / १४+६=२० | ५००.०० / १०१३.९५ | ५०६९७५/- / २६०९७५/- | १२९०००/- | १३१९७५/- | मंजूर. |
| ८] | ११८-१२० पाकमोडिया स्ट्रिट.. | दुसरा / मंडळ | तळ + ४ / ८+२=१० | ५०५.८२ / ७९६.२५ | ४०२७५९/- / ३६२७५९/- | ३३९३६५/- | २३३९४/- | मंजूर. |
| ९] | ३१ सिंधी लेन. | पहिला[स] / मंडळ | तळ + ३ / ७+१=८ | ६६६.४६ / १४७३.३९ | ९८१९५९/- / ९८१९५९/- | ४९९८४९/- | ४८२११०/- | मा. सदस्य श्री. उसपकर आणि श्री. पारकर याच्या पहाणी करण्याच्या अटीस अधिन राहून मंजूर. |
| १०] | ३६५-३८५ शेख मेमन स्ट्रिट.. | तिसरा / मंडळ | तळ + २ / १८+१४४=१६२ | ३९३९.०० / ४५२.५२ | १७८२४५८/- / ७४८३७१/- | ७४८३७१/- | — | |
| ११] | २०/२२ बापू खोटे मार्ग, क्रॉस लेन. | तिसरा / मंडळ | तळ + ४ / २३+२=२५ | ७२७.८० / ७२६.६३ | ५२८८४०/- / १८९११०/- | १८९११०/- | — | मंजूर. |
| १२] | ३१-३५ तिसरी अग्यारी लेन. | दुसरा / मंडळ | तळ + ४ / ६+२१=२७ | ४६३.५४ / ७५४.२१ | ३४९६०७/- / ३१६५६०/- | ३१४६०८/- | १९५२/- | मंजूर. |

5135413
1391994 5 ....२/-

69

ी-३-४ विभाग :-

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १] | ३३-३५ महादेव शंकरशेठ रोड [कमला भुवन]. | तिसरा मंडळ. | तळ + ३ / १८ + २=२० | ५२७.५६ / ७४१.७८ | ३९१३३७/- / २२३७२०/- | २२३७२०/- | -- | उ.मु.अ[द] यांच्या विनंती नुसार प्रस्ताव मागे घेण्यांत आला. |
| २] | ४०७ काळबादेवी रोड, [दौलत भुवन.] | पहिला [मु] मंडळ. | तळ+३+अॅटीक / ४०+२६=६६ | ३१०७.२९ / १३३१.०० | २८०४८३६/- / २८०४८३६/- | ९७१८७१/- | १२२४३३५/- | मंजूर. |
| ३] | ४०७-अे.बी. काळबादेवी रोड [दौलत भुवन]. | दुसरा [मु] मंडळ. | तळ+पोटमाळा+२ + अॅटीक / १७+७ = २४ | ७२१.०५ / २११२.८८ | १५२३४९६/- / १४४१८१९/- | २५३१९४/- | ९८२७०५/- | मंजूर. |
| ४] | ६ गजदर स्ट्रिट.. | तिसरा. मंडळ. | तळ + ५ / ४९+७=५६ | १५९१.६५ / ६१०.५७ | ९७१८०७/- / ४९४३१२/- | ४९४३१२/- | -- | मंजूर. |

—2010 9503/

डी-१ विभाग :-

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १] | ९९ अे.बी.सी.तात्या घारपुरे रोड. | चौथा<br>मंडळ | तळ + ३<br>३९+५=४४ | १३८८.२७<br>७३२.२५ | १०१६५६४/-<br>३४७७६२/- | ३४७७६२/- | --- | मंजूर |
| २] | ३५ मंगलवाडी. | दुसरा<br>मंडळ | तळ + २<br>७+०=७ | ३५४.०३<br>६९०.१८ | ३४४३४५/-<br>१५५०९०/- | १५५०९०/- | --- | मंजूर. |
| ३] | २४ नेपियन्सी रोड. | तिसरा<br>मंडळ. | तळ + २<br>६+०=६ | १८७५.१७<br>४९४.६६ | ९२७५६६५/-<br>६४०१२५/- | ६४०१२७/- | --- | मंजूर. |
| ४] | ५१, बाणगंगा रोड. | तिसरा<br>मंडळ | तळ + ३<br>२४+४=२८ | १२११.९३<br>७३८.९२ | ८९४५१७/-<br>४१८५९६/- | ४१८५९६/- | --- | मंजूर. |
| ५] | ७१ बाणगंगा रोड. | दुसरा<br>मंडळ. | तळ + २<br>१७+१=१८ | ४९१.४०<br>७०६.६३ | ३४७२३९/-<br>१९९८१६/- | १९९८१६/- | --- | मंजूर. |
| ६] | २३ सी-डी, डोंगरसी लेन रोड. | पहिला<br>मंडळ | तळ + १<br>८+०=८ | २२०.६४<br>७०२.१० | १५४९१०/-<br>१५४९१०/- | १५४९१०/- | --- | मंजूर. |
| ७] | २६३ जे.एस.एस.रोड. | तिसरा<br>मंडळ | तळ + ३<br>२+२=४ | ६८०.९२<br>८३२.३४ | ५६६७६०/-<br>३४६७६०/- | २१००९३/- | ५६०६७/- | मंजूर. |
| ८] | ६६ दादीशेठ अग्यारी मार्ग. | पहिला.<br>मंडळ | तळ + ३<br>७+०=७ | १२५२.३२<br>६८२.२६ | ८५८४५४/-<br>८५८४५४/- | ८५८४५४/- | --- | मंजूर |
| ९] | १२८-१३० वाळकेश्वर रोड. | दुसरा<br>मंडळ. | तळ + ३<br>१४+७=२१ | १३५७.८५<br>३५०.७८ | ४७६३११/-<br>३१३३११/- | ३१३३११/- | --- | मंजूर. |

23544247

विभाग.

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १] | १२६–१४४ फॉकलंड रोड[किल्न चाळ] | दुसरा.<br>मंडळ. | तळ+–१+–भाग२<br>२०+–११=३१ | १५७४.८०<br>५६१.०३ | ८८३५०६/–<br>५८२४२६/– | ५८२४२६/– | ––– | मंजूर. |
| २] | ३९–४५ तुकाराम जावजी मार्ग[मुनावाला [बिल्डिंग]. | चौथा<br>मंडळ | तळ +– २<br>६७+–४=७१ | १५५२.००<br>९१३.७९ | १४१८२०८/–<br>६५४६१५/– | ४००४१३/– | २५४२०२/– | मंजूर. |
| ३] | २९७–२९७बी जावजी दादाजी मार्ग [विली मॅन्शन]. | तिसरा[[illegible]]<br>मंडळ. | तळ +– ३<br>१७+–६=२३ | १२९३.५६<br>११०२.९१ | २४६१५४४/–<br>१११९४०९/– | | १४११३७२/– | मंजूर. |
| ४] | ६८–७२ खेतवाडी बॅक रोड, १५ फॉकलंड रोड, ३री गल्ली. | तिसरा<br>मंडळ. | तळ +– ३<br>२५+–५=३० | ५२०.५३<br>७१७.०९ | ३७३२७०/–<br>१८३०५८/– | १८३०५८/– | ––– | मंजूर. |
| ५] | १४, खेतवाडी १२वी गल्ली. | [illegible]रा<br>मंडळ | तळ +– १<br>३+–४=७ | २३३.३१<br>४८१.६७ | ११२३७९/–<br>११२६७९/– | ११२६७९/– | ––– | मंजूर. |
| ६] | २४८–२५२ फॉकलंड रोड[लतिफ बिल्डिंग] | तिसरा<br>मंडळ. | तळ +– ४<br>३१+–८=३९ | ९५५.००<br>९१५.७८ | ८७४५७७/–<br>४८२५[illegible]७/– | ३२४२५०/– | १५८३२७/– | मंजूर. |
| ७] | १८–अे–२७ डॉ. विल्सन स्ट्रिट[ग्रॉफ बिल्डिंग] | दुसरा<br>मंडळ. | तळ +– २<br>९+–२=११ | ५९०.३३<br>७२७.९८ | ५२९७४४९/–<br>३२०६८९/– | ३२९६८९/– | ––– | मंजूर. |
| ८] | ३–५ खेतवाडी ७वी गल्ली[केशव भुवन] | दुसरा<br>मंडळ | तळ +– २<br>१०+–६=१६ | ४७८.७०<br>५५३.६८ | ३५५०४०/–<br>२६४७५६/– | २६४७५६/– | ––– | मंजूर. |
| ९] | ११ फॉकलंड रोड, चौथी छेद गल्ली. | दुसरा<br>मंडळ. | तळ +– २<br>२०+–१=२१ | ५२७.३२<br>९५३.९५ | ५०३०३७/–<br>३४२५७५/– | २३५०२८/– | २०७५४७/– | मंजूर. |
| १०] | २९३–२९५ ताडदेव रोड[झवेरी भुवन] | चौथा[मु]<br>मंडळ. | तळ +– ३<br>८+–०=८ | १२०६.११<br>२२०५.५९ | २६६०१८६/–<br>२०६३१८६/– | ३०७५८४/– | १७५५६०२/– | मंजूर. |
| ११] | ६ किल्न लेन[शामराव विठ्ठल मार्ग] | पहिला [मु]<br>मंडळ. | तळ+–३+–भाग४<br>२१+–३=२४ | ७१९.२५<br>११६३.७८ | १४१२४५२/–<br>१४१२४५२/– | ५३९४४१/– | ८७३०१५/– | मंजूर. |

3205 4639/ ....

९६५

दिनांक ३०.१२.९७ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ५० व्या बैठकीत मंजूर करण्यात आलेली अंदाजपत्रकाची यादी.

[परिशिष्ट ब]

| अ.क्र. | विभाग | वर्गवारी | इमारतीचे नांव | दुरुस्तीचा उच्चार मजले: मंडळ/मालक | भाडेकरू नि.+अनि. एकूण | क्षेत्रफळ चौ.मी. / दर चौ.मी. ला | अंदाजपत्रकाची एकूण रक्कम / निव्वळ उपकराची रक्कम | रु.७५०/- चौ.मी. दराप्रमाणे मंजूरीकरिता प्रस्तावित रक्कम | रु.७५०/- चौ.मी. पेक्षा जास्त असलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११ |
| १. | ई-१ | "अ" | इ.क्र. १२७-१२९ म्हातार पाखाडी रोड | तिसरा<br>मंडळ | तळ + १<br>१८+१०=२८ | ९७४ चौ.मी.<br>६००.०४ | ५८४४३९/-<br>३३१७३०/- | ३३१७३०/- | — | मंजूर |
| २. | ई-१ | "अ" | इ.क्र. ६६ के, डॉ. बी. ए. रोड | दुसरा<br>मंडळ | तळ + २<br>१४+५=१९ | ८२५.८१<br>५१४.९८ | ४९१३४६/-<br>३५८२३६/- | ३५८२३६/- | — | मंजूर |
| ३. | ई-१ | "अ" | इ.क्र. २९ ए, हाथीबाग रोड डी. एन. सिंग रोड | चौथा<br>मंडळ | तळ+१+२ [अंशत:] | १२६६.४०<br>७०४.९६ | ९६३२६६/-<br>४७५७१३/- | ४७५७१३/- | — | मंजूर |
| ४. | ई-१ | "अ" | इ.क्र. ६३-६७ डिमटीमकर रोड डाल्मीया बिल्डिंग | तिसरा<br>मंडळ | ३६+३=३९<br>तळ + ३<br>५४+१३=६७ | १४५१.६५<br>७०३.६७ | १०७९११९/-<br>३०८८०७/- | ३०८८०७/- | — | मंजूर |
| ५. | ई-१ | "अ" | इ.क्र. १००-१०२ हाजी असलाना चाळ संत सावंता मार्ग [व्हीक्टोरिया रोड] | दुसरा<br>मंडळ | तळ+२<br>१९-१=२० | ५७६.५५<br>६४८.६६ | ३७३९८८/-<br>२६६३८४/- | २६६३९४/- | — | मंजूर |
| ६. | ई-१ | "अ" | इ.क्र. ६०-६२ डॉ. बी. ए. रोड [जैन ट्रस्ट बिल्डिंग] | दुसरा<br>मंडळ | तळ + ३<br>३०+९=३९ | १०७५.००<br>४८०.०२ | ८२८०३६/-<br>५८१८४०/- | ५८१८४०/- | — | मंजूर |
| ७. | ई-१ | "अ" | इ.क्र. ४५-५७ रामभाऊ भोगले मार्ग | तिसरा<br>मंडळ | तळ + १<br>७+८=१५ | ३८२.९३<br>७३९.४१ | २८३१४३/-<br>९२८०७/- | ९२८०७/- | — | मंजूर |

९८/८

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | | ९. | १०. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८. | ई-१ | "अ" | न.क्र. २१५-२२१ ए काळाचौकी रोड | चौथा / मंडळ | तळ + २ / १५+८=२३ | ५२५.०० / ७३३.४४ | ३८५०५६/- / १५४०५६ | एकूण | १५४०५६/- / २५६९५७३/- | मंजूर |
| | | | सुधारित अंदाजपत्रके | | | | | | | |
| ९. | ई-१ | "अ" | न.क्र. ६९-७३ नुर मंझील परेल रोड, ४ तेली गल्ली | इ.सुधारित / मंडळ | तळ + ४ / ७७+१४=८१ | २५००.२१ / ४८३.३४ | १२०८.४६१ / ९४१०९३/- | | ९४१०८३/- | मंजूर |

35105.91

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ई-२ | "अ" | ६१६ आय.एन.एम.जोशी मार्ग | ति.टप्पा | तळ+२+अंशत:३ | ५२३.०० | ३८०००९/- | १५२४३०/- | — | मंजूर |
| | | | | मंडळ | १९ + ० = १९ | ७२६.५९ | १५२४३०/- | | | |
| २. | ई-२ | "अ" | १८६-१९० बापटी रोड | पा.टप्पा | तळ + ४ | २१५८.३१ | २४०८६०९/- | ४००९७४/- | ३९८७६/- | मंजूर |
| | | | | मंडळ | १२२+२६=१४८ | ७६२.६५ | ४४०८५०/- | | | |
| ३. | ई-२ | "अ" | ३४ कामाठी पुरा १३ वी गल्ली | ति.टप्पा | तळ + १ | ३२३.८० | २४५६५५/- | १३१५०७/- | २८०५/- | मंजूर |
| | | | | मंडळ | १९ + ३ = २२ | ७५८.६६ | १३४३१२/- | | | |
| ४. | ई-२ | "अ" | १•२ शेख बुरहान कमरुद्दीन स्ट्रीट | चौ.टप्पा | तळ+३+अंशत:४ | ८९३.५० | ६६००११/- | १८१६५०/- | — | मंजूर |
| | | | | मंडळ | ३४+४ = ३८ | ७३८.७७ | १८१६५०/- | | | |
| ५. | ई-२ | "अ" | ९७ बी मोरलँड रोड | ति.टप्पा | तळ + २ | ११३५.६८ | ८१५४९८/- | ३६४३०९/- | — | मंजूर |
| | | | | मंडळ | ५२ + ० = ५२ | ७१८.०७ | ३६४३०९/- | | | |
| ६. | ई-२ | "अ" | ६१६ बी.एन.एम. जोशी मार्ग | चौ.टप्पा | तळ + ३ | १०२०.०० | ८०८७४३/- | १३४३२०/- | ४३७४३/- | मंजूर |
| | | | | मंडळ | ५२ + २ = ५४ | ७९२.८८ | १७८०६३/- | | | |
| ७. | ई-२ | "अ" | १२७ हुजूरीया स्ट्रीट | दु.टप्पा | तळ + ३ | ३३३.२५ | २४६६४३/- | १९९१९६/- | | मंजूर |
| | | | | मंडळ | ८ + २ = १० | ७३९.५१ | १९९१९६/- | | | |
| ८. | सुधारित ई-२ | "अ" | ५९७-६०३ बी.जे.मार्ग | ति.टप्पा सुधारित | तळ + २ | १३२३.०० | ९८४३९२/- | ६७२५१६/- | — | मंजूर |
| | | | | मंडळ | ५५+५ = ६० | ७४४.०६ | ६७२५१६/- | | | |

5835995/-

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | [illegible] | "अ" | इ.क्र.४१५-४२५<br>गुलाम हुसेन बिल्डिंग<br>डॉ.बी.ए.रोड | ति.टप्पा<br>मंडळ | तळ + ३<br>२८+५=३३ | ११४२.००<br>७३०.४६ | ८३४१९४.००<br>२७३३३७.०० | २७३३३७.०० | — | मंजूर |
| २. | —"— | "अ" | इ.क्र.८३-९१<br>नियामत टेरेस<br>डॉ.आंबेडकर रोड | चौ.टप्पा<br>मंडळ | तळ + ४<br>५०+१३=६३ | १८०३.००<br>५८७.४१ | १०५९१०३.००<br>३८४५७५.०० | ३८४५७५.०० | — | मंजूर |
| ३. | —"— | "अ" | इ.क्र.४०६ तुळसी<br>बिल्डिंग सेनापती<br>गणपत मार्ग | चौ.टप्पा<br>मंडळ | तळ + २<br>५८+१=५९ | २९६०.६१<br>८१७.५६ | १६०२९२९.००<br>६९४०३६.०० | ५६१५६६.५० | १३२४६९.०० | मंजूर |
| ४. | —"— | "अ" | इ.क्र.३ जोडीया<br>मॅन्शन गणपतराव<br>कदम मार्ग | ति.टप्पा<br>मंडळ | तळ + १<br>४८+०=४८ | ७२४.५८<br>७३५.३६ | ५३२८३१.००<br>२९१११८.०० | २९१११८.०० | — | मंजूर |
| ५. | —"— | "अ" | इ.क्र.२०५ मिठीबाई<br>बिल्डिंग टी.जे.रोड | ति.टप्पा<br>मंडळ | तळ + ३<br>८६+२५=१११ | २४३८.००<br>५५३.३४ | १३४९०५९.००<br>७५७२८९.०० | ७५७२८९.●० | — | मंजूर |
| ६. | —"— | "अ" | इ.क्र.१५ "ई" आशिर्वाद<br>बिल्डिंग जेरबाई<br>वाडीया रोड | प.टप्पा<br>मंडळ | तळ + ३<br>१६+०=१६ | ९६९.५२<br>७२४.५५ | ७०२४७४.००<br>७०२४७४.०० | ७०२४७४.०० | — | मंजूर |
| ७. | —"— | "अ" | इ.क्र.४५ वरळी<br>कोळीवाडा | प.टप्पा<br>मंडळ | तळ + १<br>३ + १ = ४ | १४१.६०<br>९९४.८४ | १४०८७०.०० | १०६२००.०० | ३४६७८.०० | मंजूर |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | | ८. | ९. | १०. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **सुधारित अंदाजपत्रके** | | | | | | | | | | |
| ८. | फग [द] | "अ" | क.क्र. १९ हरहरवाला बिल्डिंग, ना.म.जोशी मार्ग | दु.टप्पा सुधारीत मंडळ | तळ + ४ / १३५+१४ = १४९ | ३५९२.५० / ६३७.५१ | २२५४३४७.०० / २१३३८४०.०० | २१३३८४०.०० | — | मंजूर |
| ९. | —"— | "अ" | क.क्र. ३९०-फ कृष्णा निवास, ना.म.जोशी मार्ग | दु.टप्पा सुधारित मंडळ | तळ + ५ / ४२+० = ४२ | १६६९.८० / ६९५.१२ | ११६०७२०.०० / १०७६८४६.०० | १०७६८४६.०० | — | मंजूर |
| १०. | —"— | "अ" | क.क्र. २६०-सी साने गुरुजी मार्ग | ति.टप्पा सुधारित मंडळ | तळ + ३ / ६०+० = ६६ | १९४८.९२ / ७२६.३० | ११४५५२०.०० / ८३५०३५.०० | ८३५०३५.०० | — | मंजूर |
| ११. | —"— | "अ" | क.क्र. ३९०-३८६ पटेल बिल्डिंग गणपत राव कदम मार्ग | चौ.टप्पा सुधारित मंडळ | तळ + ३ / ८७+११ = ९८ | २३२३.५० / १०४२.३५ | २४२११९५.०० / १३५१२३३.०० | ६७१९४३.०० | ६७९२९०.०० | मंजूर |

14476648/-

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १] | फग[उ] | "अ" | २०-२०ई जगजीवन निवास गोखले रोड[उ], दादर [प]. | तिसरा / मंडळ. | तळ+-४ / २८+-६=३४ | १०००.३७ / ६७८.२१ | १२२१०४३/- / ८७६७४६/- | ८७६७४६/- | ---- | मंजुर. |
| २] | फग[उ] | "ब" | ५९अग्रवाल नगर बि.नं.२ व्हिंसेट रोड, माटुंगा. | पहिला / मंडळ | तळ +- ३ / १७+-२=१९ | ११३१.७० / ५३४.८२ | ६०५२५४/- / ६०५२५४/- | ६०५२५४/- | ---- | मंजुर |
| ३] | फग[उ] | "अ" | प्लॉट नं.७५१, रुस्तम व्हिला घंटीरोड, दादर [पुर्व]. | पहिला / मंडळ | तळ +- २ / ६ +-० =६ | ५७९.४८ / ५२१.०५ | ३०१९३९/- / ३०१९३९/- | ३०१९३९/- | ---- | मंजुर |
| ४] | फग[उ] | "ब" | ८२५-८२५ अे मालन मेंशन गोखले रोड[उ], दादर [प]. | पहिला / मंडळ | तळ +- ३ / १९ +-०=१९ | ७५८.०० / ६४४.४२ | ४८८४७६/- / ४८८४७६/- | ४८८४७६/- | ---- | मंजुर |
| ५] | फग[उ] | "अ" | ३६३ अे नारायण निवास भांडारकर रोड, माटुंगा. | दुसरा / मंडळ. | तळ +- २ / ९+-२= ११ | ५७४.०४ / ५४८.२६ | ३१५१०६/- / २८८००६/- | २८८००६/- | ---- | मंजुर |
| ६] | फग[उ] | "अ व क" | २०४ वीर सावरकर मार्ग, माहिम. | दुसरा / मंडळ. | तळ+-अंशत:१ / ३ +-०=३ | ३६१.६० / ४७५.९६ | १७२१०७/- / १४६०७२/- | १४६०७२/- | ---- | मंजुर |
| ७] | फग[उ] | "अ" | १२४ रेळे बिल्डिंग, एल.जे. रोड, माहिम. | दुसरा / मंडळ. | तळ +- २ / ७ +- १=८ | ५१३.२७ / ६०९.४३ | ३१२८०५/- / २५०६४७/- | २५०६४७/- | ---- | मंजुर. |
| ८] | फग[उ] | "अ" | ५७ तवासे बिल्डिंग, एस.एस.सी. रोड, माहिम. | तिसरा / मंडळ | तळ +- १ / ३४ +-०=३४ | ६७९.०० / ९३७.११ | ६३६४८९/- / ३७७३५८/- | २५०२१०/- | १२७०४८/- | मंजुर. |
| ९] | फग[उ] | "अ" | १२, भवानी शंकर रोड, दादर[प] | पहिला / मंडळ | तळ+-१+-अंशत: / २ +- १ = ३ | १८६.१२ / ७५९.७० | १४१३९५/- / १४१३९५/- | १३९५९०/- | १८०५/- | मंजुर |
| १०] | फग[उ] | "क" | ७३, गुरुकृपा, सायन[ईस्ट] | पहिला / मंडळ | तळ +- ३ / ७+-१ = ८ | ५९०.०८ / ८६३.२९ | ४३९४८६/- / ४३९४८६/- | ३८१८१०/- | ५७६७६/- | मंजुर |
| ११] | फग[उ] | "अ" | वसंत भुवन, रानडे रोड व से.बा. मार्ग, दादर [प]. | पहिला / मंडळ. | तळ +- ४ / ४+-१५=१९ | १८५५.३४ / ४८९.२५ | ९०७७३६/- / ९०७७३६/- | ९०७७३६/- | ---- | मंजुर. |

.....२/-

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२] | फग[उ] | "ब" | २३८-२३८ ई झेनब निवास<br>एल.जे. रोड, दादर. | दुसरा<br>मंडळ. | तळ+-३+-अंशत:४<br>४३+-२=४५ | १८०६.४६<br>४१५.६१ | ७५०७८५/-<br>६६३३९४/- | ६६३३९४/- | ---- | मंजूर |
| १३] | फग[उ] | "अ" | ४, ४अे, ६-६अे, सदगुरु बिल्डिंग<br>क्र. १, बि.एस. रोड, दादर[प]. | तिसरा<br>मंडळ. | तळ+-२<br>२०+-६=२६ | ७०८.००<br>७३५.४२ | ५२०७३०/-<br>२३९०८०/- | २३९०८७/- | ---- | मंजूर. |
| १४] | फग[उ] | "क" | २३३ भास्कर भुवन, एल.जे. रोड<br>माहिम. | पहिला<br>मंडळ | तळ + ३<br>७+-१=८ | ६१९.००<br>४१२.२२ | २५५१६५/-<br>२५५१६५/- | २५५१६५/- | ---- | मंजूर. |
| १५] | फग[उ] | "क" | १५ एफ, तुकारामसदन, भगत<br>गल्ली, माहिम. | दुसरा<br>मंडळ. | तळ + ३<br>१२+-०=१२ | ८१८.००<br>८८५.७४ | ७२४५३८/-<br>६१०५५१/- | ४९९५१३/- | ११४०२८/- | भाडेकरुंनी त्यांच्या हिश्या-ची अधिकची रक्कम भरण्याच्या अटीस अधिन राहुन मंजूर. |
| १६] | फग [उ] | | २३४ कमल पार्क, पांडुरंग नाईक<br>मार्ग, माहिम. | पहिला<br>मंडळ | तळ + ३<br>१०+-०=१० | ७८१.१७<br>४९८.६१ | ३८९५०२/-<br>३८९५०२/- | ३८९४०२/- | ---- | मंजूर. |
| १७] | फग[उ] | "अ" | २४ राधा कॉटेज, आर.के. वैद्य<br>रोड, दादर [प]. | तिसरा<br>मंडळ | तळ + २<br>८+-०= ८ | ३५७.७७<br>८२८.६५ | २९६४६७/-<br>११२०००/- | ८३८६०/- | २८१३९/- | मंजूर. |
| १८] | फग[उ] | | इ.क्र. ५३, वसंत भवन, लखमशी<br>नप्पु रोड, दादर [पु]. | पहिला[पु]<br>मंडळ. | तळ + २<br>५ +-५=१० | ४४१.२१<br>७३२.६६ | ३२३२५९/-<br>३२३२५९/- | ३२३२५९/- | ---- | मंजूर |
| १९] | फग[उ] | | इ.क्र. ४७-अे, हनिफ चेंबर<br>सितलादेवी रोड, माहिम. | दुसरा[पु]<br>मंडळ. | तळ+-४+-५अंशत:<br>१७+-३= २० | ८७४.७२<br>७२८.०६ | ६३६८५६/-<br>५२८५४७/- | ५२८५४७/- | ---- | मंजूर. |

R242126